


शनिवार । २४ ऑक्टोबर १९७० । चाळीस पैसे

## दिवाळी अंक / काही निवडक


ब. मो. पुरंदरे — संथ प्रवरा वहात होती

विद्याधर पुंडलिक — इरावतीबाई : चैतन्याचा एक झोत

गो. नी. दांडेकर — कुणा एकाची भ्रमणगाथा

एक मुलाखत — पोलादी पडद्याआडची संगीत हिरवळ

विजय तेंडुलकर — 'काही सुचत नाही, पण बघतो,
उद्यापर्यंत जमलं तर काही पाठवतो.'

शनिवार २४ ऑक्टोबर १९७०

# माणूस


| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकूणतिसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


यापुढील बुधवार दिनांक २८ ऑक्टोबरचा अंक
दिवाळी अंक
म्हणून प्रसिद्ध होत असून
या दीपावली विशेषांकाची किंमत
रुपये चार आहे.
दिवाळीनंतर महिनाभर अंक
प्रकाशित होणार नाहीत.
बुधवार दिनांक २ डिसेंबर १९७०
पासून अंक प्रकाशन पुन्हा सुरू होईल.
वाचक, वर्गणीदार, विक्रेते यांनी
कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक
माणूस द्विसाप्ताहिक

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# हम सब चोर है !

विजय वैद्य

तुम्ही कधी काळी तुमचं जुनं झालेलं घड्याळ निकालात काढून नवं घेण्याचा विचार करता. कोणते घड्याळ घ्यावं यासंबंधी मित्रमंडळी, ओळखीचे लोक यांच्याकडे चौकशी करता. तुम्हाला अनेक जण सल्ला देतात, 'लेका दुकानात कसलं घड्याळ घेतोस. महागात पडेल, अमक्या अमक्याकडे जा. स्मगलींगची घड्याळं विकतो तो. माल चांगला आणि स्वस्तात मिळेल.' स्वस्त व अधिक चांगल्या वस्तू कोणाला नको असतात ? हिंदुस्थानात तयार होणाऱ्या कापडापेक्षा आपण जपानहून येणारं टेट्रेक्स पसंत करतो, 'मार्लबोरो' या 'इम्पोर्टेड' सिगारेटस् ओढण्यात आपण धन्यता मानतो. 'फिलिशेव्हर' 'कॅनॉन'चा कॅमेरा, 'सेमर'चं घड्याळ, 'सोनी' ट्रॅन्झिस्टर 'ग्रुंडींग' टेपरेकॉर्डर, 'शेव्हरलेट' वा 'मर्सडिझ बेंझ' या मोटारी इत्यादि 'इम्पोर्टेड' वस्तू आपल्याला नेहमीच हव्याहव्याशा वाटत असतात. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा त्या वस्तू आपण विकत घेतो. भले देशात तयार झालेल्या वस्तू गुणवत्तेत किती का चांगल्या असेनात, पण 'फॉरीन'ची वस्तू म्हणताच (मग तिची 'क्वालिटी' चांगलीच, असं मनोमन ठरवून टाकून) आपल्या उड्या पडतात.

या वस्तू आपण दुकानात बिल देऊन घेतल्या तर समजण्यासारखं आहे, कारण त्या वस्तू येथे येतात त्यावेळी त्यावर जकात आकारली जाते आणि सरकारला त्यापासून उत्पन्न मिळतं, म्हणजेच पर्यायानं देशाच्या गंगाजळीत त्याची भर पडते. पण जेव्हा या 'इम्पोर्टेड' वस्तू अनधिकृतपणे विकत घेतल्या जातात तेव्हा त्या चोरट्या मार्गांनी येथे आलेल्या असतात. तुम्ही आम्ही जेव्हा ह्या वस्तू विकत घेतो तेव्हा त्या घेताना आपण फार मोठा गुन्हा करीत आहोत याची जाणीवच नसते. अनेकदा अगदी इनोसन्टली अशा वस्तू खरेदी केल्या जातात. पण यामुळेच देशाला भयानक धोका निर्माण झाला आहे. आज देशातील सर्वच मोठ्या शहरात बिनदिक्कतपणे, राजरोस चोरट्या वस्तूंची विक्री होते. मुंबईतील दादाभाई नौरोजी

दिवाळी आली–
सुंदर सुंदर वस्तू
उंची किंमतवान वस्तू
इंपोर्टेड–स्वस्त वस्तू
विकत घेण्यासाठी
आपण हौशीने घराबाहेर पडणार.

हौस भागवण्यापूर्वी
निदान 'एवढे' माहीत तरी असावे.
'एवढे' मोठे जाळे !
अशी यंत्रणा, असे लागेबांधे !

भारताची अर्थव्यवस्थाच
पोखरून काढणारा एवढा
प्रचंड उद्योग चालतो तरी कसा ?

(बोरीबंदर ते फाऊंटनपर्यंत) रस्त्यावरील विक्रेते उघडपणे या वस्तू विकत असताना दिसतात. अनेक वेळा आपण, वर्तमानपत्रात जकात अधिकाऱ्यांनी धाड घालून १० लाखाचं सोनं जप्त केलं, ४० हजार रुपयांची परदेशी दारू पकडली अशी बातम्या वाचतो आणि एवढं घबाड पोलीस वा जकात अधिकाऱ्यांच्या हाती लागल्याबद्दल आनंदून जातो खरे, पण हाती पडलेला हा माल म्हणजे काहीच नाही. आपल्याकडे हजार रुपये असावेत आणि त्यापैकी दहा पैसे कुठेतरी पडून गहाळ व्हावेत तसा हा प्रकार आहे. चोरट्या व्यापारामुळे अनेक भयानक गोष्टी होत असतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला तो एक प्रचंड हादरा असतो. दुसरं म्हणजे हा व्यापार सुरळीतपणे चालावा म्हणून जकात, पोलीस वा इतर सरकारी अधिकारी, राजकारणी मंडळी यांचे हात हा व्यापार करणाऱ्यांकडून भरले जातात. येथे नुसत्याच नैतिकतेचा अधःपात होतो असं नव्हे तर त्यांच्या पैशामुळे मिंधी झालेली ही मंडळी त्यांच्याविरुद्ध काही कारवाई करू शकत नाहीत आणि यातूनच शासन–यंत्रणा पोखरली जाते, खिळखिळी होते.

अलीकडेच 'करंट' या साप्ताहिकाच्या संपादकांनी एका अंकात लिहिलं होतं, 'लवकरच राजकारणी नव्हे तर चोरटा व्यापार करणारे भारतावर राज्य करतील' ('व्हेरी सून दि स्मगलर्स, नॉट दि पोलिटिशन्स विल रूल इंडिया') वाचकहो, हे फार फार भयानक आहे. आपल्यापैकी अनेकांना अमेरिकेतील 'माफिया' ही काय चीज आहे हे कदाचित माहिती असेल. पुढे मागे केव्हा तरी मी आपली 'माफिया'शी ओळख करून देईन, आता फक्त एवढंच लिहितो की 'माफिया' नावाच्या अत्यंत वाईट संघटनांनी–ज्या चोरटा व्यापार, खूनबाजी वगैरे सर्वच वाईट उद्योगात दंग असतात–अमेरिकेत जवळजवळ प्रतिसरकार उभारलं आहे. अमेरिकेसारख्या अत्यंत बलाढ्य राष्ट्राच्या राजधानीत, खुद्द वॉशिंग्टनमध्ये त्यांची गुंडगिरी खुल्लम खुल्ला चालू असते. आज भारताचंही चित्र त्याच मार्गावर असल्यासारखं दिसतं आहे. इथले स्मगलर्स फारच लवकर माफियाच्या मार्गानं जाऊ लागतील, नव्हे ते तसे जाऊ लागले आहेत. वाचकहो ! यातील भयानकता व परिणाम, यासंबंधी वाचून आपण सुन्न व्हाल, अस्वस्थ व्हाल, बेचैन व्हाल. अनेक 'थोरामोठ्यांचे' हातही यात गुंतलेले असतात. वाचा हे सर्व.

१३ जुलै १९६० सालची गोष्ट आज माझ्या नजरेसमोर येते आहे. एक तरुण कार्यकर्ता त्या दिवशी दादर स्थानकावरील रेल्वेच्या रुळांवर आडवा पडला होता. त्याला संपावर असलेल्या केंद्रीय सरकारी नोकरांच्या प्रश्नांकडे लोकांचं लक्ष वेधायचं होतं. याच तरुणानं त्यानंतर अनेक वेळा 'बंद'चे अनेक कार्यक्रम यशस्वी केले. आज तोच तरुण खूप खूप प्रसिद्ध आहे, एका पक्षाचा सरचिटणीस आहे, आणि लोकसभेचा सदस्यही आहे. चोरटा व्यापार करणाऱ्यांच्या मार्गावर आज तो आडवा झाला आहे. हा व्यापार बंद करण्याचा मनसुबा आखून राहिला आहे. त्या तरुण राजकीय नेत्याबरोबर झालेल्या मुलाखतीतून या भयानक व्यापारासंबंधीचा तयार झालेला हा आलेख आपल्याला सादर करीत आहे. वर्णनावरून आता पावेतो ही व्यक्ती कोण हे लक्षात आलं असेलच.

होय होय !! बरोबर ओळखलंत, हे आहेत खासदार श्री. जॉर्ज फर्नांडिस ऊर्फ जॉर्जसाब. आज श्री. फर्नांडिस या प्रश्नानं अत्यंत बेचैन झाले असून या प्रश्नाचा पाठपुरावा करण्याचा त्यांनी निश्चय केला आहे. पण हा सर्व एका छोट्या पत्राचा प्रताप आहे. काही महिन्यांपूर्वी भिवंडी येथील पब्लिक ॲक्शन कमिटीकडून एक पत्र आलं. तसं पहाता या पत्राच्या प्रती प्रधानमंत्री, गृहमंत्री व काही संसद सदस्यांनाही पाठविण्यात आल्या होत्या. पण फक्त श्री. जॉर्ज साहेबांनीच त्यात लक्ष घातलं आणि त्यानंतर या प्रश्नावर सातत्यानं माहिती मिळवणं, लोकसभेत प्रश्न विचारणं आदि गोष्टी त्यांनी सुरू ठेवल्या. भिवडीहून आलेलं पत्र, भिवंडी विभागाच्या केंद्रीय जकात खात्याच्या सुपरिटेंन्डट (श्री. के. के. वर्मा)च्या काही कारवायांसंबंधी होतं. त्या अधिकाऱ्याचा चोरट्या व्यापाऱ्यांशी संबंध असल्याचं

त्या पत्रात म्हटलं होतं. हा प्रश्न श्री. फर्नांडिस यांनी प्रथम हाती घेतला. त्यासंबंधी प्रधानमंत्र्यांना पत्रं लिहिली. (श्री. के. के. वर्मा यांची आता नासिक येथे बदली करण्यात आली आहे) आजही ते वेळोवेळी असे प्रकार प्रधानमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत असतात.

आपण प्रथम, चोरटा व्यापार किती प्रमाणात चालतो, कोणत्या कोणत्या गोष्टी येथे चोरटया मार्गांनी आयात केल्या जातात, किती प्रमाणात देशाचं नुकसान होतं वगैरे पार्श्वभूमी पाहू या.

आंतरराष्ट्रीय बाजारभावात ज्याची किंमत सुमारे १००० कोटी रुपये होईल इतका माल प्रतिवर्षी भारतात चोरटया मार्गांनी आणला जातो. येथे त्याची किंमत बरोबर दुप्पट आहे, म्हणजेच २ हजार कोटी रुपये किंमतीचा चोरटा व्यापार दरवर्षी होतो आणि हे २ हजार कोटी रुपये, चोरटा व्यापार करणाऱ्या समाजकंटकांच्या हाती पडतात, म्हणजेच सरकारी तिजोरी एवढया प्रचंड पैशाला मुकते. (भारत सरकारचं वार्षिक अंदाज पत्रक ३ हजार कोटी रुपयांचं आहे तर चोरटा व्यापार करणारे २ हजार कोटी रुपये बळकावतात, किती भयानक आहे हे !! )

या व्यापारात सर्वात अधिक गुंतवणूक आहे सोन्याच्या व्यापारात. यात दरवर्षी सुमारे २०० कोटींची उलाढाल होते आणि १०० टन सोनं येथे आणलं जातं.

त्यानंतर क्रम लागतो घडयाळं, कापडं, सूत, शेव्हर, बॅटरीज आदि छोटया छोटया इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अनेक बडयांची तल्लफ भागविण्याकरिता लागणाऱ्या उंची सिगरेटस्. 'इंडिया टोबॅको'चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एच्. एन्. हक्कसर यांच्या म्हणण्याप्रमाणे दरवर्षी १ कोटी रुपये किंमतीच्या परदेशी सिगरेटस्‌ची चोरटी आयात होते.

आता या सर्वांची किंमत द्यावी लागते. या वस्तू काही स्मगलर्सना फुकट मिळत नाहीत, व ती बिलं देण्याइतकं परकीय चलन त्यांच्याकडे उपलब्ध नसतं. म्हणून पुढील मार्गांनी हे काम केलं जातं. बेकायदेशीररीत्या येथून चांदी निर्यात केली जाते (चांदीच्या आयात–निर्यातीवर सरकारनं बंदी घातली आहे. पण यापैकी खूपशी चांदी नेपाळहून येते तर काही भारतात असणाऱ्या चांदीच्या प्रचंड साठयातून दिली जाते. भारतात चांदीच्या खाणी नाहीत.)

प्रतिवर्षी भारतात अनेक प्रवासी येतात. ते भारताला ३५ कोटी रुपयांचं परकीय चलन उपलब्ध करून देतात पण अंदाजे तितकीच रक्कम स्मगलर्सच्या हातात पडते. देशातील जवळ जवळ प्रत्येक उंची हॉटेल त्यांचा स्वर्ग आहे. डॉलरचा अधिकृत दर ७–५० रु. एवढा आहे पण काळया बाजारात तो १३ रुपये आहे. अर्थातच प्रवासी त्यांच्याकडील परकीय चलन या काळयाबाजारवाल्यांना देऊन त्यांच्याकडून अधिक भारतीय चलन प्राप्त करतात व या योगे स्मगलर्सच्या हातात (काळयाबाजारवाल्यांकडून) पौंडस्, डॉलर्स, प्रवासी चेक्स वगैरे जातात हा दुसरा मार्ग.

काही लाचखोर भारतीय उद्योगपती, चोरटा–व्यापार करणाऱ्यांना परकीय चलन उपलब्ध करून देतात.

परदेशात असणारे अनेक भारतीय त्यांच्या, येथील कुटुंबियांना पैसे पाठवत

## शासनयंत्रणा हे वाचते का ?

चोरट्या व्यापारात सोन्या-चांदीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सोन्याची येथे आयात केली जाते तर चोरट्या आयातीची बिलं चांदीच्या निर्यातीनं च इतर मार्गांनी भागविली जातात.

आपण कोणत्याही दिवशीचं इंग्रजी वर्तमानपत्र उघडा, विशेषतः 'फायनान्शियल एक्सप्रेस' वा 'दि इकॉनॉमिक टाइम्स'. त्यात 'बुलियन मार्केट' या सदराखाली सोन्याचांदीच्या बाजारपेठेतील उलाढालीसंबंधीची वार्ता असते. त्या बातमीत चोरट्या सोन्या-चांदीसंबंधीचेही उल्लेख असतात. ही पहा त्यांची उदाहरणं–

सप्टेंबर २३ च्या 'फायनान्शियल एक्सप्रेस' मधील हा कॉलम पहा. "सुरुवातीला ( बाजारातील व्यवहाराच्या ) चांदीचा भाव ५०३·५० रु. होता. पण चांदीच्या चोरट्या निर्यातीच्या बातम्यांमुळे आणि चांदीच्या नाण्यांची ( बाजारात येणाऱ्या ) कमतरता यामुळे हे भाव ५०५ रु. ७५ पैसे यावर ४-२५ रु. हा अधिक भाव घेऊन वाढले."

"चोरट्या मार्गाने चांदी निर्यात करणाऱ्यांकडून मुळीच मागणी न आल्यामुळे 'Complete absence of demand from contraband exporters' दिल्लीच्या बाजारपेठेतील चांदी नरमाईत राहिली." इंडियन एक्सप्रेस, सप्टेंबर २६.

सप्टेंबर २८ 'पॅट्रिएट' दिल्ली – "चोरटं सोनं कमी प्रमाणात आल्यामुळे सोन्याचा भाव १० ग्रॅमला १७७-५० रु., रु. १७९-५० वरून १८० रु. ते १८२ रु. पर्यंत वर गेला."

प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचे शेअर्स अधिक प्रमाणात असलेलं 'नॅशनल हेरॉल्ड' हे दिल्लीतील वर्तमानपत्र २९ सप्टेंबरच्या अंकात काय म्हणतं पहा. "उत्तर प्रदेश आणि बिहार येथून ४५ बार एवढी चांदी (कच्ची) येऊनही चांदीचे भाव चढतेच राहिले. कारण गेल्या काही दिवसात फार मोठ्या प्रमाणात चांदी चोरट्या मार्गानं मुंबई, गोवा, मद्रास, राजस्थान, गुजरात, पंजाब येथून देशाबाहेर गेल्याचं कळतं.' हेच वर्तमानपत्र सोन्याबाबत पुढे म्हणतं, "चोरट्या मार्गानं सोनं आल्याचा परिणाम म्हणून ( सोन्याची ) बेकायदेशीर देवाण-घेवाण प्रत्येक १० ग्रॅममागे १ रुपयाने खाली आली."

२८ सप्टेंबरच्या दिल्लीच्या 'स्टेटस्मन' मधील पुढील काही ओळी— "आठवड्याच्या सुरुवातीला ५२३ रु. या भावाने चांदी विक्रीला सुरुवात झाली, पण भारत ग्रीससाठी नाणी बनविणार असल्याच्या बातमीनं हा भाव आठवड्याच्या मध्यास ५२५ रु. पर्यंत गेला होता, पण जकात अधिकाऱ्यांच्या सक्त जागरूकपणामुळे हा भाव ५२४ रु. वर स्थिरावला."

असतात. ते त्यांच्याकडील परकीय चलन त्या देशातील अशा प्रकारच्या डीलसना देतात व त्यावद्दल हिंदुस्थानातील त्यांच्या कुटुंबियांना अधिक पैसे मिळतात. उदा. ५०० रु. मिळण्याऐवजी १ हजार रु. मिळतात व त्यांच्या हातातील परकीय चलन

---

## छे ! हे तर काहीच नाही !!

चोरटा व्यापार करणाऱ्यांपैकी कुली ऊर्फ हाजी मस्तान मिर्झा हे फार बडं धेंड. मस्तानवर सध्या कोर्टात खटला चालू आहे.

एक्सप्लनेड कोर्टात चीफ प्रसिडेन्सी मेजिस्ट्रेटपुढे मुंबईच्या कस्टम्सचे असिस्टंट कलेक्टर श्री. डी. व्ही. सोहनी यांनी कुली मस्तानवर आरोपपत्र दाखल करताना त्याच्या कारवायांचा जो आलेख कोर्टाला सादर केला त्याची ही छोटीशी झलक पहा–

६६ सालातील जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात त्याने – मस्तानने बेकायदेशीररीत्या जी चांदी भारताबाहेर पाठविण्याचा, त्याचप्रमाणे जे सोनं येथे आणण्याचा प्रयत्न केला आणि जो चोरटा माल पकडला गेला त्याची ही अंदाजे आकडेवारी.

| | चांदी निर्यात कि. ग्रॅ. मध्ये | | बाजारातील त्या चांदीची किंमत रु. |
|---|---|---|---|
| १) | २,१३० | —— | ०७,६०,४१० |
| २) | ३,७५० | —— | १३,३८,७५० |
| ३) | ७,२०० | —— | २५,७०,४०० |
| ४) | ४,१७० | —— | १४,८८,६९० |
| ५) | ४,४७० | —— | १५,९५,७९० |
| एकूण | २१,७२० | —— | ७७,५४,०४० |

| | (अंदाजे) सोनं आयात, तोळ्यात. | | बाजारातील त्या सोन्याची (अदाजे) किंमत |
|---|---|---|---|
| १) | ०३,००० | —— | ०५,७०,००० |
| २) | ०५,००० | —— | ०९,५०,००० |
| ३) | १०,००० | —— | १९,००,००० |
| ४) | २०,००० | —— | ३८,००,००० |
| ५) | १०,००० | —— | १९,००,००० |
| एकूण | ४८,००० | | ९१,२०,००० |

याशिवाय घड्याळे असलेली ८ बंडल्सही पकडली गेली. त्यात प्रत्येकी सुमारे ८ हजार (बाजारातील किंमत सुमारे ८,००,०००) ते १८,००० (बाजारातील किमत सुमारे १०,००,००० ते ३४,२०,०००) एवढी घड्याळे होती. ही आकडेवारी आहे शुल्लक प्रमाणात पकडल्या गेलेल्या चोरट्या मालाची; तर न पकडला गेलेला किती चोरटा माल या देशात रोजच्या रोज येत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी.

अशाप्रकारे चोरट्या व्यापारासाठी उपलब्ध होतं.

या देशातून गांजा, अफू इत्यादी अनेक मारक द्रव्यं बाहेर जात असतात. या व्यापारात (अर्थातच चोरट्या मार्गानं) जी मंडळी गुंतलेली आहेत त्यांना हा माल निर्यात करून जे परकीय चलन मिळतं ते परकीय चलन ते परदेशांतून आपल्या देशात चोरटी आयात करणाऱ्यांना देतात आणि अशा रीतीनं हा ताळेबंद पूर्ण होतो,

एक गोष्ट मात्र सत्य आहे. सरकारी यंत्रणेतील अनेकांचं सहाय्य असल्याशिवाय रोजच्या रोज चालणारा हा प्रचंड व्यापार करणं कसं शक्य आहे ?

जॉर्जसाब मला सांगत होते, 'अहो अनेकांची लोकसभेत व लोकसभेबाहेर नावं घेऊन वा लेखी आरोप करून त्यांचे चोरटा व्यापार करणाऱ्यांशी असलेले संबंध उघडे केले आहेत.' प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातूनही त्यांचा उल्लेख केला आहे. श्री. अॅग्रोल व श्री. कंपानी हे सेंट्रल बोर्ड ऑफ एक्साइज अॅन्ड रेव्हेन्यूचे वरिष्ठ अधिकारी असून बोर्डाचे अध्यक्ष होण्याबाबत त्यांच्यात चढाओढ चालू आहे. त्यांच्यासंबंधीही मी प्रधानमंत्र्यांना लिहिलं आहे.' ते पुढे सांगतात, " दिल्लीच्या इंपिरीयल हॉटेलच्याबाहेर बसून मंदिरातील चोरट्या मूर्ती परदेशी लोकांना विकणारा मनू नारंग व त्याचा भाऊ रामू नारंग मुंबईतील टॉप ऑफ दि टाऊन व अॅम्बॅसेडर या मोठ्या हॉटेलचे आज मालक आहेत हे सर्व कशाच्या जोरावर ? सी. बी. आय. नं त्यांच्यावर चोरट्या व्यापाराबाबत दोन केसेस दाखल केलेल्या आहेत."

मुंबईतील कुलाबा येथील सोना डिपार्टमेंटल स्टोअर्सचा मालक रजब अली हा माणूस 'भारतातील होणाऱ्या चोरट्या आयातीपैकी जवळजवळ निम्मी आयात करतो' असं सांगून ते माझ्यापुढे या संबंधी त्यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्राला पंतप्रधानांनी लिहिलेलं उत्तर ठेवतात. पंतप्रधानांच्या पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे. 'In your letter of the 17th March you have mentioned Shri Rajab Ali and Shri K. K. Varma. The department of Customs and Central Excise is aware of Rajab Alis's activities and necessary investigations are in progress. Shri. P. C. Sethi has already written to you regarding Shri. K. K. Varma.' (आपल्या १७ मार्चच्या पत्रात आपण श्री. रजब अली आणि श्री. के. के. वर्मा यांचा उल्लेख केला आहे. केंद्रिय अबकारी आणि जकात खात्याला श्री. रजब अली यांच्या उद्योगाची माहिती असून आवश्यक ते तपास चालू आहेत. श्री. के. के. वर्मा यांच्याबाबत पी. सी. सेठी यांनी आपल्याला या आधीच लिहिले आहे.)

मी पत्र वाचून पुरं करतो. आता मला ते नैनमल पुंजानी, शहा आणि कुली मस्तान यांच्यासंबंधी सांगू लागतात. 'पुजांनी हा येथील स्मगलर्सपैकी तीन सर्वात मोठ्यापैकी एक असून राजस्थानचे मुख्यमंत्री श्री. सुखाडियांचा मित्र. सध्या

कोर्टात त्याच्यावर खटला चालू असून त्याच्या नावे बँक ऑफ दुबाईमध्ये १०० कोटी रुपये, पौंड आणि डॉलर्समध्ये असल्याचा सरकारी अधिकाऱ्यांचा आरोप आहे. १९६३ पर्यंत मुंबईच्या डॉकमध्ये २ रुपये रोजगारावर कुली म्हणून काम करणारा मस्तान मिर्झा सुप्रसिद्ध 'बॉम्बे गराज'चा मालक असून चोरट्या सोन्याच्या व्यापाराबाबत ह्याला माजी उपपंतप्रधान व अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांच्या हुकूमावरून गेल्यावर्षी जुलैमध्ये अटक करण्यात आली. त्याला जामिनावर सोडविण्यासाठी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात त्याचं वकीलपत्र घेऊन उभे कोण राहिले? तर ज्यांना इंदिराबाई सुप्रीम कोर्टाचे सर न्यायाधीश बनवू इच्छितात, जे पूर्वी मद्रास राज्याचे अॅडव्होकेट जनरल होते आणि जे आज 'इंडियन एअर लाइन्स'चे अध्यक्ष आहेत ते श्री. मोहनकुमार मंगलम्. त्यांची फी दिवसाला ७ हजार रुपये! श्री. कुमार मंगलम् उभे राहूनही जामीन नाकारण्यात आला; पण त्याला प्रकृतीच्या कारणांवरून सेंट जॉर्जेस हॉस्पिटल येथे ठेवण्यात आले व तेथे तो सर्व काही उद्योग करू शकत होता. विदेशी दारू, सिगरेटस्, बाया सर्व काही त्याला तेथे मिळत होते व माझे हे आरोप प्रधानमंत्री व महाराष्ट्राचे मुख्य-मंत्री यांनी अजून नाकारलेले नाहीत.'

हाजी मस्तानला परदेशी जाण्याबाबत परवानगी द्यावी म्हणून गुजरातचे भूत-पूर्व राज्यपाल नित्यानंद कानुंगो यांनी मे ६६ मध्ये लिहिलेलं पुढील पत्र पहा–

'I have known Shri Haji Mastan Mirza through Shri Akhtar Syed of Bombay as a citizen with good antecedents. He desires to travel to Aden to take care of his relatives there. It is essential that he should travel soon for which the necessary papers may be granted.'

मस्तानला 'समाजकार्यकर्ता' म्हणून स्पेशल कॅटेगरीमध्ये फोन मिळावा म्हणून कोणी शिफारशी केल्या या लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाचं दळणवळण खात्याचे राज्यमंत्री श्री. शेरसिंग यांनी दिलेलं उत्तर पहा–

१. श्री. आदम अदिल, एम. एल्. ए. २. श्री. बी. एम्. याज्ञिक, दारूबंदी मंत्री, मुंबई, ३. श्री. भगवानदास के. आसर, अध्यक्ष बी–वॉर्ड डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटी, ४. टी. पी. करीमशा, ५. श्री. एम्. ए. खताळ, ६. श्री. इस्माइल ख्वाजा हुसेन, ७. श्री. स. का. पाटील, ८. नगरसेवक श्री. बाबुराव शेटये. श्री. पाटील यांनी ९ मार्च १९६८ रोजी मस्तानला फोन मिळण्यासाठी दिलेलं शिफारसपत्र पुढीलप्रमाणे आहे, 'I have been knowing Shri. Haji Mastan Mirza for a long time. He is a social worker from Warden Road, Bombay. He is connected with a number of organizations in various capacities. A telephone connection is very necessary for him to carry on his

social duty. I strongly recommend his case for registration under Exempted Category.'

मस्तानच्या 'सोशल ड्युटी'बद्दल आज खटला चालू असून त्याला २० लाखाच्या जामिनावर सोडण्यात आलं आहे.

भिवंडीतील मेमध्ये उडालेला जातीय दंगलीचा भडका, तेथे चालणाऱ्या चोरट्या व्यापारावरून सर्वांचं लक्ष दुसरीकडे वेधून घेण्याबाबत मुद्दाम आयोजित करण्यात आला होता असं म्हटलं जातं आणि त्यात काही तथ्य नसेलच असं नाही.

भारताइतका चोरटा व्यापार इतरत्र कोठेच चालत नसेल. गेल्या वर्षी एकूण २४.०६ कोटी रुपयांचा माल पकडला गेला. हे प्रमाण एकूण व्यापाराच्या फक्त ५ टक्क्यांइतकेच आहे असं सुप्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा. बी. आर्. शेणॉय यांनी एका व्याख्यानात अलीकडे सांगितलं.

चोरट्या व्यापारात विद्यार्थी, मुत्सद्दी एवढंच नव्हे तर धर्मगुरूही गुंतलेले आहेत. धर्मगुरू त्यांच्या झग्यामधून सोनं व इतर माल चोरून आणतात. पण यातही सर्वात महत्त्वाची कामगिरी बजावली जाते ती मुत्सद्यांकडून. ते एखाद्या देशात वर्षातून २० वेळा जाऊ शकतात. या व्यवसायात असणाऱ्या इतरांना मात्र दहा दहा निरनिराळे पासपोर्टस् बाळगावे लागतात, कारण पासपोर्टवर व्हिसा असावा लागतो आणि ते व्हिसाचे अनेक स्टॅम्पस् पाहून संशय उत्पन्न होण्याची शक्यता असते.

वरील पार्श्वभूमीवर आता हा व्यापार कसा केला जातो, विशेषत: सोन्याची चोरटी आयात वगैरेसंबंधी माहिती पाहू.

जगामध्ये सर्वाधिक महत्त्वाचा धातू आहे सोनं. निदान सामान्य माणसाच्या दृष्टीनं तरी त्याला निश्चितपणे महत्त्व आहे. सोन्याची साठेबाजी करणे वा दागिन्यांच्या रूपानं ते स्वत:जवळ बाळगणे ही गोष्ट आपल्या देशात आज पूर्वापार चालत आली आहे. लग्नसमारंभ म्हणजे सोन्याशिवाय पान हालणार नाही. बँक ऑफ इंग्लंडच्या एका गव्हर्नरनं अनेक वर्षापूर्वी भारताबाबत पुढील उद्गार काढले होते आणि आजही ते तितकेच खरे आहेत. तो म्हणाला होता, 'जोपर्यंत भारतात लग्नं होत रहातील तोपर्यंत आंतरराष्ट्रीय पातळीवरील सोन्याच्या चोरट्या व्यापाराला आळा घालणे कठीण आहे.' (भारतात सुमारे ४० लक्ष एवढ्या प्रमाणात दरवर्षी लग्नं होत असतात आणि कमीत कमी पाऊण तोळा तरी सोनं प्रत्येक लग्नात लागतंच.)

गरीब शेतकरी, कामगार वा इतर कोणालाही, कोणत्याही पडत्या काळात सोनं उपयोगी पडतं. खरं म्हणजे सोनं हेच आंतरराष्ट्रीय स्थिर चलन असून कोठेही, केव्हाही आणि काहीही खरेदी करण्याची शक्ती सोन्यात आहे. किंबहुना याच कारणांमुळे सोन्याची फार प्रचंड प्रमाणात येथे आयात होते. दुसऱ्या

महायुद्धाच्या सुरुवातीला सोन्याच्या आयात-निर्यातीवर बंधनं घालण्यात आली होती. पुन्हा एकदा १९४७ साली अशी बंधनं घालण्यात आली. शिवाय कोलारच्या खाणीतून फारच थोडं सोनं मिळू शकतं. (गेल्या वर्षी फक्त ३,१९४ किलोग्रॅम्स एवढेच.) जगातील सर्वात कमी सोनं उत्पादन करणारा देश भारत आहे. म्हणूनच चोरट्या सोन्याचा कायम ओघ भारताकडे लागलेला असतो. (मुंबईतील सोने-चांदी बाजारातील माहितगार मंडळींच्या मते आंतरराष्ट्रीय सोन्याच्या भावापेक्षा तोळ्यावर फक्त ३० रुपये अधिक घेऊन जरी चोरट्या व्यापाऱ्यांनी हा व्यापार केला तरीही ते चांगलाच नफा मिळवू शकतील.) चोरट्या व्यापाराची व व्यापाऱ्यांची मक्का म्हणजे मुंबई होय. पावसाळ्यातही जवळ जवळ प्रत्येक दिवशी इराणचे आखात, अबुदावी, दुबाई येथून मुंबईकडे सोनं नियमितपणे येत असतं.

हे सर्व अविरतपणे चालू असल्याची सरकारला पूर्ण कल्पना आहे. फक्त, कदाचित त्या मागचा 'ब्रेन' कोण आहे हे माहीत नसण्याची शक्यता आहे. पण

---

सप्टेंबर २८ च्या स्टेटस्‌मनच्या अंकात एक छोटा लेख आला असून त्यात इंग्लंडमधील सोन्याचे भाव वाढण्याची शक्यता असल्याचं म्हटलं आहे. तेथील सोन्याचे भाव वाढले की, त्याचा परिणाम येथील भाव वाढण्यात होणारच. कारण दुबाई आणि इराणचं आखात येथून येणारं सोनं इंग्लंड-कडून येत असतं.

अशी अनेक उदाहरणं देता येतील. प्रत्येक दिवशी अशा बातम्या 'कमर्शियल पेज' वर दिलेल्या असतात. ज्या बातम्या सामान्य बातमीदार मिळवू शकतो त्या बातम्या शासनयंत्रणेला मिळत नसतील हे कसं शक्य आहे? पण... पण जाऊ दे. यावर अधिक बोलण्याची वा लिहिण्याची काही गरज आहे काय?

'बिस्किट'—ज्या एका विशिष्ट आकारात चोरटं सोनं येतं त्याला 'बिस्किट' असं म्हटलं जातं. प्रत्येक बिस्किटाचं वजन १० तोळे असतं आणि ते ९९९-० एवढ्या मोठ्या प्रमाणात (सर्वाधिक प्रमाणात) शुद्ध असतं. बिस्किटाची लांबी, रुंदी, जाडी पुढील प्रमाणे असते. १$\frac{३}{४}$"×१"×$\frac{३}{८}$." काळ्या बाजारात साधारणपणे तोळ्याला २०० रु. वा अधिक पैसे पडतात. म्हणजे एका बिस्किटाची किंमत जवळजवळ २०० रुपये होते. आंतरराष्ट्रीय भावापेक्षा हा भाव दुप्पट आहे.

भारताची घड्याळांची गरज प्रतिवर्षी जवळजवळ ९० लक्ष एवढी आहे. त्यापैकी फक्त १॥ दशलक्षच घड्याळे भारतात तयार होतात; तर खूप प्रमाणात घड्याळे परदेशातून आयात केली जातात. पण तरीही परदेशांतून फार मोठ्या प्रमाणात घड्याळांची चोरटी आयात केली जाते. बंगलोरच्या एच्. एम्. टी. ह्या घड्याळ तयार करणाऱ्या कारखान्याच्या प्रमुखाधिकाऱ्यांच्या मते दरवर्षी सुमारे २०० लक्ष घड्याळं चोरट्या मार्गानं हिंदुस्तानात आयात केली जातात.

---

अजूनपर्यंत या सर्वांवर नजर ठेवून याला पायबंद कसा घालावा याचा अभ्यास करण्यासाठी अधिकाऱ्यांना तेथे पाठविण्यात आल्याचं अजूनही ऐकिवात नाही. वॉल स्ट्रीट येथून प्रकाशित होणाऱ्या एका मासिकानुसार दुबाई येथे सुमारे १८ 'रॅकेटस्' या कामात दंग असतात. त्यापैकी ७ 'रॅकेटस्' फार बडी आहेत. सोन्याची ने आण करण्याकरिता हेलिकॉप्टर्सचाही वापर केला जातो. त्याचप्रमाणे 'धायपर'सारख्या छोट्या विमानांचाही स्मगलर्स उपयोग करतात. (वॉलकॉट-डोंझे यांच्या मुरूड येथील नाट्यपूर्ण लॅन्डींगची स्मृती अजूनही आपल्या मनात ताजी असेलच.) वरील 'रॅकेटस्' दरवर्षी सुमारे १५० दशलक्ष डॉलर्सची उलाढाल करतात.

मुंबई आणि आजूबाजूच्या भागात जकात अधिकाऱ्यांच्या थोड्या अधिक जागरूकतेमुळे चोरटा व्यापार करणारी मंडळी आता दक्षिण भारतीय बंदरांकडे वळली आहेत. (मुंबईचा बोजा थोडा कमी झाला, मात्र मालाची एकूण आवक आहे तेवढीच.) झांजिबार येथून लवंगाही फार मोठ्या प्रमाणात चोरट्या मार्गांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्याकडे अविरतपणे येत असतात.

भारताचा पश्चिम किनारा चोरट्या व्यापाराच्या दृष्टीनं अत्यंत सोईस्कर आहे. सोनं दुबाई, इराणचे आखात वगैरे ठिकाणांहून येत असतं. भारताला सोनं (चोरटं) पुरवणारा दुबाई हा पिटूकला देश आहे तरी केवढा? तर फक्त १,२५० चौरस मैल. लोकसंख्या अवघी ६५ हजार. हा देश पूर्णपणे चोरट्या व्यापारावर जगतो आहे.

भारतात बेकायदेशीररीत्या येणाऱ्या सोन्यापैकी ८० टक्के सोनं दुबाईहून येतं. अर्थातच मागे म्हटल्याप्रमाणे हे सर्व सोनं वा अन्य चोरटा माल भारताच्या पश्चिम किनाऱ्याकडे येतो. हे सोनं लंडनच्या सोनं बाजातात विकत घेतलं जातं. तेथे सोनं विकत घेणाऱ्या अनेक मोठ्या गिऱ्हाईकात दुबाईचा क्रम वरचा लागतो. दुबाई येथे सोनं स्वस्त, म्हणजे फक्त ३५ डॉलर्सला एक औंस या भावानं मिळतं. ६७ साली दुबाईनं ११२·५ कोटी रुपयाचं सोनं खरेदी केलं. अर्थातच त्यापैकी खूप मोठ्या प्रमाणात ते भारताकडे पाठविण्यात आलं. लंडनप्रमाणेच स्वित्झर्लंड आणि फ्रान्स येथेही हे सोनं विकत घेतलं जातं.

हे सर्व सोनं आपल्या पश्चिम किनाऱ्याकडे कसं आणलं जातं यासंबंधीचा उल्लेख चौकटीमध्ये आला आहेच. त्याच्यापुढील भाग असा आहे: पडाव येताच मुंबईतील एजन्टस्ना खबर पाठविली जाते. (अनेक पडावांवर वायरलेस सेटस् असतात). त्यात पडाव केव्हा कुठे असेल, कप्तानाचं नाव, संकेत स्थळ वगैरे कळवलं जातं. बहुतेक करून भारतीय सागरी हद्दीबाहेर आंतरराष्ट्रीय सागरी-हद्दीत (भारतीय किनाऱ्यापासून सुमारे १५ मैलांवर) कोठेतरी संकेत स्थळ असतं. अनेक वेळा या प्रकारची माहिती घेऊन दुबाईहून मुंबईकडे एकादा मनुष्य विमानानं

घेतो. हे सर्व सोपस्कार पार पडताच येथील एजंट इंजिन लावलेला मचवा, त्याच-प्रमाणे पडावातील सोनं उतरवून घेणाऱ्या गँगजना गाठतो आणि मग मोहिमेला सुरुवात होते. ठरलेल्या स्थळी हा मचवा येताच व तेथे वाट पहात असलेला चोरटं सोनं आणणारा पडाव दिसताच सांकेतिक संदेशांची देवाण घेवाण होते व ओळख पटताच त्यावरील सोनं येथील मचव्यावर उतरवून घेण्यात येतं. काही वेळा येथील मचव्याला वाटाड्या मचव्याची व रक्षक मचव्याची साथ असते आणि हे तिन्ही मचवे एकसाथ तेथे जातात. त्यानंतर सोनं उतरवून घेताच वाटाड्या मचवा किनाऱ्याकडे परततो आणि सब कुछ ठीक है अशी खात्री पटताच सोनं घेऊन येणाऱ्या मचव्यास किनाऱ्याकडे येण्याचा संदेश दिला जातो. यापुढे हा सर्व माल मोटारी, ट्रक्स आदि वहानांतून अन्य ठिकाणी हलविला जातो. मुंबईच्या आजूबाजूला असलेली कोळ्यांची अनेक गावं या कामात महत्त्वाची कामगिरी बजावीत असल्याचं म्हटलं जातं.

पश्चिम किनाऱ्याकडून ८० टक्के सोनं येतं तर उरलेलं सोनं (२० टक्के) कलकत्ता, मद्रास, पूर्व किनारा, मकाव, हाँगकाँग, सिंगापूर, पूर्व पाकिस्तान, फिलीपाइन्स, थायलंड व नेपाळकडून येतं, तर काही प्रमाणात ते लाहोर, अमृतसर मार्गे दिल्लीकडे येत असतं. विमानं व बोटींची इंजिन्स, मोटारींच्या मड-गार्डमध्ये केलेली खास सोय, कोळणींच्या टोपल्या, भाजीपाला व जळाऊ लाकूड यांची वहातूक करणाऱ्या लॉऱ्या यामधून, एवढंच नव्हे तर माणसांच्या पायांवर शस्त्रक्रिया करून त्यात चिपा ठेवून व नंतर तो भाग पुनः शिवून टाकून आदिप्रकारे सोन्याची वहातूक केली जाते.

मुंबईतील ससून डॉक, कफ परेड, वरळी सी फेस, कुलाबा, ठाण्याची खाडी, मड, मनोरी व जुहूचा समुद्र किनारा, अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, रेवदंडा, रत्नागिरी, म्हैसूर व केरळचा किनारा, कोचीन, त्याचप्रमाणे वसई, वरसोवा, दांडा आदि ठिकाणी चोरटा माल येण्याची संकेत स्थळं आहेत. हे सर्व काम अत्यंत जलद आणि शिस्तबद्ध काम करणाऱ्या यंत्रणेमार्फत सफाईदारपणे केलं जात असल्यानं फारच थोड्या वेळा मोहीम फसते. या यंत्रणेत काम करणाऱ्यांपैकी एखादी व्यक्ती काही कारणामुळे नाराज होते, त्याचवेळी मोहिमेची बातमी फुटून माल पकडला जातो. अन्यथा अशी शक्यता फारच कमी असते.

जगातील खाणींमधून काढलेल्या सोन्यापैकी १/२ एवढं सोनं भारताकडे येतं. गेल्या काही वर्षांत पकडलं गेलेलं सोनं व त्या सोन्याचे आंतरराष्ट्रीय भाव पुढीलप्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| १९६५ साल | – | १ कोटी २२ लक्ष |
| १९६६ ,, | – | १ कोटी ९५ लक्ष |
| १९६७ ,, | – | ४ कोटी १० लक्ष |
| १९६८ ,, | – | ३ कोटी ३३ लक्ष |
| १९६९ ,, | – | ५ कोटी ३१ लक्ष |

तर १९६९ साली संपलेल्या ३ वर्षात बेकायदेशीररीत्या देशाबाहेर गेलेल्या चांदीचं प्रमाण आहे ७० दशलक्ष औंस आणि त्याची किंमत आहे १,३०० दशलक्ष डॉलर्सच्या जवळपास; तर त्याच काळात भारतातून अधिकृतरीत्या जी चांदी निर्यात करण्यात आली आणि ज्यावेळी चांदीचे आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव (१९६७–६८) फार वाढलेले होते त्यावेळी निर्यातीमुळे झालेली चांदी होती २ दशलक्ष औंस आणि त्याची किंमत होती ०.५० दशलक्ष डॉलर्स. किती विदारक चित्र आहे हे पहा. ( भारतात सुमारे ४००० दशलक्ष औंस चांदीचा साठा असल्याचा अंदाज आहे. )

वाचकहो, हे सर्व वाचून आपण सुन्न झाला असाल. किती प्रचंड प्रमाणात चालतो हा चोरटा व्यापार! देश या व्यापारामुळे रसातळाला जायला कितीसा वेळ लागेल ? किती प्रचंड प्रमाणात आज परकीय चलन चोरट्या व्यापारामुळे देशाबाहेर जात आहे ! याहीपेक्षा समाजाला त्यामुळे जी कीड लागत चालली आहे ती तर भयानकच आहे.

थोड्या श्रमात अधिक लवकर श्रीमंत होण्याचा हा मार्ग पत्करण्यासाठी अनेक तरुण पुढे येत आहेत. बेकारीचा प्रश्न अशा रीतीने अनेक जण सोडवू इच्छित आहेत. अनेकांनी तो याप्रकारे सोडविलही आहे.

मुंबईतील अनेक हॉटेल्समध्ये तरुण–तरुणी हॅशीश, गांजा सेवन करून बेभान होतात. डोंगरीतील एक अड्डा मी स्वत: पाहिला आहे, जेथे चोरून अफू इत्यादींचं अखंड पान करण्यासाठी चांगल्या घरातील अनेक तरुण मुलीही येतात.

छे ! छे ! देश 'माफीया'च्या हाती जाता नये. पण हे सर्व आपल्या हातात आहे. या सर्व प्रकारांविरुद्ध जनमत जागृत होणं आवश्यक आहे. सर्वांनी खंबीरपणे आवाज उठविला पाहिजे तरच हे काम होणं शक्य आहे. हे काम एकट्या दुकट्याचं नाही.




अरुण गोसावी

अखेर रिपब्लिकन पक्षाचे दोन तुकडे पूर्ण झालेच. पक्षाच्या नागपूर अधिवेशनात पक्ष-कार्यकारिणीने बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आणि इतर चार सदस्यांना पक्षातून वडतर्फ केले. खोब्रागडे गटाने आपली वेगळी बैठक घेतली आणि वेगळी कार्यकारिणीही निवडली आणि या पक्षाच्या दोन चुली होण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. अगोदरच पक्षाच्या भंडारे आणि कांबळे यांच्या दोन चुली वेगळचा होत्याच त्यात ही आणखी भर.

पक्षाच्या वादावादीला सुरुवात कोठून झाली हे मागे दिलेच होते. दादासाहेब गायकवाडांचा दीर्घ आजार, त्यातून उद्भवणाऱ्या समस्या यातून हे प्रकरण निर्माण झाले. मध्यंतरी समझोत्याचे प्रयत्न झाले. पण भांडणाची आग दोन चार तपेले पाणी टाकून विझण्यासारखी नव्हती. अखेर आगीने पक्षवैऱ्याचा बळी घेतलाच. खोब्रागडे गटाचे म्हणणे दादासाहेब गायकवाड स्वतः सज्जन आहेत. पण त्यांच्याजवळची मंडळी त्यांच्या आजारपणाचा गैरफायदा घेतात. तर गायकवाड गटाचे म्हणणे खोब्रागडे यांना संपूर्ण पक्षावर ताबा पाहिजे आहे. म्हणून ते भांडणे उकरून काढतात. अखेर वाद विकोपाला जाऊन पक्षाला तडा गेला. खोब्रागडे यांना नव्या पक्षाचे अध्यक्ष करण्यात आले.

खोब्रागडे गटाचे म्हणणे हे की पक्षातील फाटाफुटीला काँग्रेसच जबाबदार आहे. सत्तेच्या लालसेने पक्षातील काही मंडळी काँग्रेसकडे आकर्षिली जातात. आणि त्यांना हाताशी धरून पक्षात फूट पाडण्याचा काँग्रेस प्रयत्न करते असे त्यांचे म्हणणे. महाराष्ट्र विधान परिषदेचे उपाध्यक्ष श्री. रा. सु. गवई यांना काँग्रेसने निवडणुकीत पाठिंबा दिला तेव्हापासून पक्षातल्या कुरबुरी वाढल्या असे त्यांचे म्हणणे.

या ठिकाणी पक्षाचे दोन तुकडे झाले असे म्हणण्यापेक्षा खोब्रागडे गट पक्षातून फुटून निघाला असे म्हणणेच जास्त सयुक्तिक ठरेल. कारण कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्याच मागे बहुसंख्य रिपब्लिकन पक्ष-जनता आहे हे उघड आहे. कांबळे आणि भंडारे पक्षाबाहेर पडले तेव्हाही तसेच झाले.

श्री. गायकवाड यांचे संघटनाचातुर्य लक्षात घेण्यासारखे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर पक्षाची ताकद सांभाळून ठेवण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. त्यांनी दलितांच्या मागण्या संघटीत केल्या. त्यांनी आयोजित केलेली भूमिहीनांची चळवळ भारताच्या इतिहासात अपूर्व अशी होती. डॉ. आंबेडकरांचा पुतळा पार्लमेंटच्या आवारात लावण्याची आपली मागणी त्यांनी शेवटपर्यंत तडीला नेली. आणि रिपब्लिकनांच्या भावना सुखावल्या. महाराष्ट्र कॉंग्रेसशी त्यांनी समझोता केला. कारण सत्तारूढ पक्षाशी झुंज करावी पण संघर्ष करू नये आणि आपल्या मागण्या पदरात पाडून घ्याव्यात ही नीती त्यांनी यशस्वीपणे अवलंबिली. त्यांच्या या नीतीचा बौद्ध समाजाला बराच फायदा झाला आहे. त्यामुळे बव्हंशी बौद्ध जनता दादासाहेब गायकवाडांच्याच मागे राहणार यात शंका नाही.

कॉंग्रेसच्या फाटाफुटीनंतर जसे झाले तसेच लहान प्रमाणात याही पक्षात झाले. आमचाच खरा पक्ष असे दोन्ही गटांचे म्हणणे. पण खरा पक्ष अध्यक्ष दादासाहेब गायकवाडांचा आहे हे कोणी नाकारणार नाही. निदान जोवर खोब्रागडे गट आपली ताकद दाखविण्यासारखे काही करीत नाही तोवर तरी हीच समजूत कायम राहील.

फाटाफुटीमुळे पक्षाची ताकद खच्ची झाली आहे काय? कर्मवीर गायकवाड म्हणतात– मुळीच नाही. पक्षातील फुटीमुळे आमचा पक्ष मुळीच दुर्बल झालेला नाही. काही लोक पक्षाच्या बाहेर गेले. ते चांगले झाले. त्यामुळे आमचा पक्ष आता एकदिलाने आणि एक विचाराने चालू शकेल आणि अधिक मजबूत होईल, असे ते म्हणाले.

इकडे खोब्रागडे गटाने आपले धोरण जाहीर करताना मागासलेल्या वर्गांना प्रतिनिधित्व देण्याकरता त्यांच्यासाठी वेगळे मतदार संघ तयार करण्याच्या


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**लेखक : वि. स. वाळिंबे**

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०**

कल्पनेचा पुरस्कार केला. या कल्पनेचा खोब्रागडे गट कितपत पाठपुरावा करणार आहे हे अजून स्पष्ट झालेले नाही.

रिपब्लिकन पक्षाची निवडणूक निशाणी हत्ती आहे. पक्ष फुटला आणि दोन्ही गट आता आपणच मूळ पक्ष आहोत असा दावा करीत आहेत. त्यामुळे हत्तीच्या निशाणीवरून या दोन्ही गटात आता वाद माजला आहे. काँग्रेस निशाणीप्रमाणेच निवडणूक मंडळापुढे रिपब्लिकन निशाणीचाही खटला उभा राहील असे दिसते.

## परदेशी दौरे – बेस्ट

सध्या म्हणे सांताक्रूझ विमानतळाकडे मंत्र्यांच्या मोटारींची रीघ लागलेली असते. आपले मंत्री अतिशय अभ्यासू असल्याने त्यांना अनेक विषयांच्या अभ्यासाची गोडी असते. पण मुंबईत असताना किंवा महाराष्ट्रात असताना राज्यकारभाराचे जे प्रचंड ओझे त्यांच्या शिरावर असते त्यामुळे त्यांना अभ्यासास वा ज्ञानार्जनास थोडाही वेळ मिळत नाही. त्यामुळे सारेच मंत्री फार दुःखी असतात. संधी मिळेल तेव्हा ते चटकन विमानाने कोठेतरी परदेशात जाऊन येतात आणि कुठल्यातरी विषयाचा अभ्यास करून टाकतात. हे काही महाराष्ट्राच्याच मंत्र्यांच्या बाबतीत खरे नाही. सर्वच राज्यांचे मंत्री कमी-अधिक प्रमाणात असेच अभ्यासू असतात.

मागच्या महिन्यात महाराष्ट्रातले अर्धे-अधिक मंत्री असेच परदेशी अभ्यास-दौऱ्यात मग्न होते म्हणे. अर्थमंत्री, उद्योगमंत्री, राज्य-उद्योगमंत्री, गृहनिर्माण मंत्री, बांधकाममंत्री, मुख्यमंत्री – सारे अभ्यासात गढलेले. परदेशी. मागे शिक्षणमंत्रीही असाच एक अभ्यास दौरा करून आलेले. प्रत्येक मंत्र्याला अभ्यासाची अशी एकदा ना एकदा संधी साधावीच लागते. मंत्र्यांचे जीवन मोठे खडतर असते. त्यामुळे अभ्यास करण्याची अशी संधी आली की सहसा कोणी ती सोडीत नाही. खरोखर आपल्या अभ्यासू मंत्र्यांप्रमाणेच आपली जनताही ज्ञानाच्या तृष्णेने व्याकूळ होऊन अभ्यास करू लागली तर देशाच्या प्रगतीला फार काळ लागणार नाही. अर्थात सगळ्यांची ज्ञानतृष्णा भागविण्यासाठी त्यांना परदेशी पाठविता येणार नाही.

मंत्र्यांपासून धडे घेऊन आपणही असेच परदेशाचे अभ्यासदौरे आखण्याचे स्तुत्य उपक्रम मुंबई महापालिकेच्या काही पुढाऱ्यांनी केले होते. पण काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना परदेशच्या प्रवासाच्या मौजा तेवढ्या नजरेवर येतात. या प्रवासात केवढा अभ्यास करावा लागतो, केवढे कष्ट करावे लागतात, मेंदूला किती त्रास द्यावा लागतो हे या लोकांना कळत नाही. त्यामुळे या छिद्रान्वेषक प्रवृत्तीच्या लोकांनी या उपक्रमांना जोरदार विरोध केला आणि अखेर या अभ्यासू मंडळींचा बेत हाणून पाडला.

हे अभ्यासू पुढारी म्हणजे बेस्ट कमिटीचे अध्यक्ष प्रमोद नवलकर. बेस्टचे एक शिष्टमंडळ श्री. नवलकर यांच्या नेतृत्वाखाली लंडन आणि पश्चिम युरोपात जाणार होते. बेस्टच्या बसेसना जे सांगाडे लागतात त्यांचा अभ्यास करून योग्य ते सांगाडे सुचविणे हा या शिष्टमंडळाच्या दौऱ्याचा उद्देश.

या दौऱ्याविरुद्ध महापालिकेच्या काही नतद्रष्ट सभासदांनी टीकेचे मोहोळ उठविले. दौऱ्याची गरजच काय ? बेस्टच्या अध्यक्षांना बसच्या सांगाड्यांचे काय ज्ञान आहे ? ते काही एक्स्पर्ट थोडेच आहेत ? आणि सांगाड्यांचा अभ्यास करायला लंडनला जावे लागते ? गरीब जनतेचा पैसा खर्च करून ? वगैरे–

अखेर या टीकेला कंटाळून बेस्टच्या शिष्टमंडळाचा हा संकल्पित दौरा रद्द झाला. प्रमोद नवलकर शिवसेनेचे. त्यामुळे त्यांच्या-या फसलेल्या उपक्रमाचे परळ पोटनिवडणुकीत भांडवलही झाले. दौरा रद्द करविण्याचा आनंद मात्र विरोधकांना मिळाला.

महानगरपालिका अधिकाऱ्यांचा आणखी एक दौरा असाच टीकेस कारणीभूत झाला आहे. महापालिका कमिशनर डॉ. मधुकर देसाई आणि पालिकेचे इतर दोन अधिकारी स्टुटगार्डला जात आहेत. लोकांचा पैसा खर्च होतो आणि अधिकारी चैन करतात. लटपटी, खटपटी करून स्टुटगार्डचे निमंत्रण मिळविले वगैरे प्रकारची तुफान टीका या अधिकाऱ्यांवर झाली.

शेवटी कमिशनरांना खुलासा करावा लागला की आम्ही आमंत्रणावरूनच परदेशी जात आहोत. हे आमंत्रण आम्ही मिळविले हा आरोप खोटा आहे. १९६५ सालीच हे आमंत्रण आले होते.

डॉ. देसाई म्हणाले की आम्ही जात आहोत ते तेथील नागरी सुखसोयींचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांचा इकडे मुंबईत कसा उपयोग करता येईल ते अजमाविण्यासाठी. आमच्या दौऱ्यात आम्हाला खूप काम करावे लागणार आहे. स्टुटगार्डच्या वेळापत्रकात सकाळपासून रात्रीपर्यंत भरगच्च कामे आहेत. अनेक नागरी विषयांचा अभ्यास करावा लागणार आहे. केवळ हौसेखातर ही ट्रीप आहे असे म्हणणे निराधार आहे !

अधिकाऱ्यांचाही दौरा हाणून पाडण्याचा मंडळींचा बेत अशा तऱ्हेने फिसकटला.

परंतु बेस्ट शिष्टमंडळाचा दौरा खड्डयात ढकलला ही कामगिरी काय कमी झाली ? ज्या वीरांनी हा पराक्रम केला ते नव्या काँग्रेसचे नगरपिते आणि बेस्टचे सदस्य लिंगण्णा पुजारी व सावे यांचा परवा त्यांच्या पक्षातर्फे केवळ याच कामगिरीसाठी सत्कार करण्यात आला. एखाद्या शिष्टमंडळाचा दौरा रद्द केला म्हणून कुणाचा सत्कार आतापर्यंत झाला होता ? आपल्याकडे काहीही घडू शकते. या दोन पुढाऱ्यांचा मोठा समारंभपूर्वक सत्कार झाला. समारंभाच्या अध्यक्षपदी महापालिका काँग्रेसपक्षाचे नेते व्ही. जी. वांद्रेकर हे होते. त्यांनी गोरगरीब जनतेच्या खिशातला

पैसा वाचविला म्हणून पुजारी आणि सावे यांच्या पाठीवर थाप दिली.

तेव्हा हे असे आहे. ज्याचे करायला जावे भले...

मंत्र्यांच्या दौऱ्यांवरही टीका होतात. पण मंत्र्यांचे परदेशदौरे बहुतकरून त्या त्या देशांच्या निमंत्रणावरून होतात. त्यामुळे त्या टीकांना ते तोंड देऊ शकतात. पण लोक जळत राहतातच. आपल्या देशातील एकूणच वातावरण अभ्यासू आणि व्यासंगी मनोवृत्तीला पोषक नाही. स्वतः अभ्यास करायचा नाहीच. दुसऱ्यालाही करू द्यायचा नाही अशी वृत्ती. म्हणूनच अभ्यास करायचा असला की मंत्री एकदम परदेशी झेप घेतात. उगाच नव्हे.

## पाच कोटींची नवी योजना

मुंबईतील झोपडपट्ट्या सुधारण्यासाठी आखलेली पाच कोटी रुपयांची जी योजना फुटली म्हणून बोंब झाली होती ती अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे.

पश्चिम राजमार्गावरच्या माहीम काजवेपासून सांताक्रूझ विमानतळापर्यंतच्या साडेतीन किलोमिटर अंतरापुरतीच ही योजना सध्या मर्यादित आहे. या भागातल्या गलिच्छ वस्त्यांच्या पुनर्विकास योजनेसाठी केन्द्र सरकारने रिव्हॉल्वींग फंडातून पाच कोटी रुपये मंजूर केले आहेत.

संपूर्ण योजनेचा खर्च तीस कोटी रुपये आहे आणि ती तीन टप्प्यात पूर्ण होणार आहे. सहा वर्षांच्या आत ही योजना पूर्ण होईल. या योजनेनुसार राजमार्गाच्या दोन्ही बाजूंना व्यापारी इमारती आणि शोरूम्स् बांधण्यात येतील. या इमारतींसाठी जागा लिलावाने विकण्यात येतील आणि येणारे पैसे झोपडपट्टीवासीयांसाठी गाळे बांधण्याकरता वापरले जातील.

पण मग या एक्स्प्रेस राजमार्गाचे काय? एक्स्प्रेस राजमार्गावर कोठेही फारसे पादचारी मार्ग आडवे जाता कामा नयेत मोटारींना कुठेही न थांबता सरळ वेगाने जाता आले पाहिजे ही एक्स्प्रेस राजमार्गाची मूळ कल्पना. रस्त्याच्या बाजूला दुकाने काढली की रहदारी वाढलीच समजा. म्हणजे मग या राजमार्गाचा एक्स्प्रेसपणा काय उरला? आता मुंबईतल्या इतर भागातले झोपडपट्टीवाले आपले नशीब केव्हा उघडते याची वाट पाहत आहेत.

□ □ □

सु. ल. सोमण

# अमेरिका पाकला शस्त्रे देणार

शेवटी, हो नाही करता करता, अमेरिकनं पुन्हा एकदा पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करायचं ठरवलं. वास्तविक पाकिस्तानला होणाऱ्या अमेरिकन शस्त्रपुरवठ्यात खंड तसा कधीच पडला नव्हता. १९६५ च्या भारत-पाक युद्धानंतर, अमेरिकेनं दोन्ही पक्षांना एकाच मापानं मोजून शस्त्र-पुरवठा बंद केला होता. परंतु १९६७ ला 'दुरुस्ती' करण्यासाठी 'सुटे भाग' पाकिस्तानला पुरवण्याचा निर्णय अमेरिकेनं घेतला. त्याचप्रमाणे इराण, तुर्कस्तान, प. जर्मनी आदी 'नाटो–'सेण्टो' राष्ट्रांना त्या त्या करारांखाली पुरवलेली शस्त्रास्त्रं देखील पाकिस्तानला पाठवण्याचे उद्योग झाले. आता हे सर्व आडपडदे झुगारून देऊन सरळ सरळ शस्त्रास्त्र-पुरवठा करण्याचं धोरण अमेरिकेनं घोषित केलं आहे! एका दृष्टीने हे ठीकच झालं. सारखा लोकशाहीचा टेंभा मिरवणाऱ्या ह्या पश्चिमी राष्ट्रांचा निश्चित कल कुणीकडे आहे ते पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध झालं आहे! ह्या मदतीच्या संबंधात अमेरिकन सरकारने काही युक्तिवाद मांडले आहेत. परंतु त्यातला फोलपणा विशद करून सांगायला खास भाष्याची आवश्यकता आहे असं मला तरी वाटत नाही.

अमेरिकेच्या ह्या धोरणावर भारतभर कडाडून टीका होत आहे, होत राहील. परंतु खुद्द अमेरिकेतही ह्या धोरणाविरुद्ध ओरड सुरू झाली आहे. त्याची थोडीशी झलक 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या संपादकीयानं परवा दिली आहे. दक्षिण आशियातल्या एका स्फोटक प्रश्नात ह्या धोरणामुळे अमेरिका स्वतःला गुंतवून घेत आहे असं म्हणून हे संपादकीय पुढं म्हणतं, '...मध्य व दक्षिण पूर्व आशियातल्या झगड्यातून सही सलामत बाहेर पडता पडता अमेरिकेला नाकीनऊ येत आहे. अगोदरच तिथे प्रचंड झळ अमेरिकेला सोसावी लागत आहे...अशा परिस्थितीत आणखी एका प्रश्नाला इंधन पुरवून, अमेरिका भारतीय उपखंडात स्फोटक परिस्थिती निर्माण

कश पहात आहे....दोन्ही गटांना शस्त्रसज्ज करून परिस्थिती स्फोटक करण्या ऐवजी राजनैतिक पातळीवरून त्यांच्यातले मतभेद मिटविण्याचे प्रयत्न अमेरिकेनं केले पाहिजेत...'

अमेरिकेची पाकिस्तानला ही नवीन मदत अर्थातच सर्वस्वी 'राजकीय' स्वरूपाची आहे. पाकिस्तानात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुका (त्या तूर्त पुढे ढकलल्या गेल्या आहेत) चीन-पाकिस्तान चुंबाचुंबी, रशियाचा पाकिस्तानातला शिरकाव ह्या साऱ्यांचा परिपाक म्हणजे ही मदत आहे! पाकिस्तान मात्र, अमेरिका-रशिया-चीन ह्या तिघांच्या स्पर्धेचा धूर्तपणे उपयोग करून घेत आहे ह्यात शंका नाही !

## दक्षिण विएतनाम—निक्सन योजना

दक्षिण विएतनाम प्रश्नावर अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन ह्यांनी आपली 'शांतता-योजना' मांडली आहे. अध्यक्षांची योजना मॉस्को, पेकिंग, हनोई वगैरे सर्व संबंधितांनी तूर्त फेटाळून लावलेली असली तरी ती केवळ 'अधिक उकळण्या-साठी'च फेटाळून लावली आहे. हे निश्चित. कारण प्रे. निक्सन ह्यांच्या नव्या सूचना बऱ्याचशा त्यांच्याच पथ्यावर पडणाऱ्या आहेत. शिवाय ह्या सूचना म्हणजे अमेरिकेचा 'यशस्वी माघारी' या प्रयत्नच भासाव्यात इतक्या अमेरिकेच्या पूर्वीच्या धोरणाला सोडून आहेत. शस्त्रांच्या बळावर हे युद्ध आपण जिंकू शकत नाही हेही अमेरिकेनं जाणलं असावं व म्हणूनच, तावडतोब युद्धबंदीची (कुठल्याही अटीशिवाय) योजना प्रे. निक्सन मांडतात. क्रमाक्रमानं अमेरिकन फौजा माघारी बोलावण्याची तयारी दर्शविताना, विएतकाँग फौजाही द. विएतनाममधून बाहेर पडल्या पाहिजेत असा आग्रह धरीत नाहीत. त्याचप्रमाणे ह्या प्रश्नावर 'जिनिवा परिषदे'प्रमाणे एखादी आंतरराष्ट्रीय परिषद बोलावण्याची सूचना करून, रशियाच्याच नव्हे तर चीनच्याही उपस्थितीला ते हरकत घेत नाहीत. तर त्याही पुढे जाऊन 'नॅशनल लिबरेशन फ्रंट' सरकारात प्रतिनिधित्व मिळावं हेही ते तत्त्वत: मान्य करतात.

अमेरिकन अध्यक्षांनी ह्या सूचना आपल्या ताज्या दौऱ्यानंतर केल्या आहेत हे ह्याठिकाणी लक्षात घेतलं पाहिजे. आफ्रिका, मध्यपूर्व, भूमध्य व हिंदी महा-सागर, लॅटिन अमेरिका ह्या सर्वच ठिकाणी रशियाचा प्रभाव आस्ते आस्ते वाढत आहे. उलट द. विएतनाम, कंबोडिया, मध्य पूर्व ह्या साऱ्याच प्रश्नात अमेरिकेला बरीच राजकीय हानी सोसावी लागली आहे. हे लक्षात घेतलं तर, विएतनाममधून काढता पाय घेऊन, रशियन प्रभावाविरुद्ध अमेरिकन प्रतिमा तयार करता यावी

म्हणून टाकलेल्या ह्या पाक्लाचा अर्थ लागू शकतो. कम्युनिस्ट राष्ट्रे अमेरिकेच्या ह्या नाडलेल्या परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा घ्यायचा प्रयत्न करतील हे सांगायलाच नको !

## बड्यांच्या चर्चा—बर्लिनची वाट

पश्चिम बर्लिन हे पूर्व जर्मनीत, पश्चिम जर्मनीपासून एकशे दहा मैलांवर उभे आहे. पूर्व जर्मनी कम्युनिस्ट वर्चस्वाखाली आहे तर, तिथे असलेलं पश्चिम बर्लिन ११० मैलांवरील पश्चिम जर्मनीशी संलग्न आहे. साहजिकच बर्लिन ही आज जर्मनांची एक सर्वात मोठी समस्या आहे, आणि विशेषत: पश्चिम बर्लिन ! प. बर्लिन, तिथले रहिवाशी, त्यांच्या समस्या—ह्या साऱ्यांसाठी बड्या चौघांच्या सतत वाटाघाटी चालू आहेत आणि रशिया व इंग्लंड—फ्रान्स—अमेरिका ह्यांनी देवाण-घेवाणीचा काहीच प्रयत्न न केल्यास हा प्रश्न लोंबकळतच राहण्याची भीती आहे.

प. जर्मनीला हा प्रश्न त्वरित सुटावा असं वाटणं साहजिकच आहे. त्यासाठी त्यांचे प्रमुख विली ब्राण्डट् ह्यांनी कसोशीने प्रयत्नही चालविले आहेत. मित्रराष्ट्रांवर तर त्यांनी दडपण आणायचा प्रयत्न केला आहेच, परंतु रशियाबरोबर ताजा 'अनाक्रमण—करार' करून, रशियावरही ह्या प्रश्नाबाबत काही तरी त्वरित केलं जावं असं दडपण आणायचा प्रयत्न केला आहे. ह्या दडपणांचा काहीतरी परिणाम होईल अशी अपेक्षा होती. परंतु ह्या दुर्दैवी शहरात, आठवड्यापूर्वी पुन्हा सुरू झालेल्या बड्या चौघांच्या बैठकीनं ह्या अपेक्षा फोल ठरवल्या आहेत. 'पश्चिम बर्लिन' हे पश्चिम जर्मनीशी कसलेही संबंध नसलेलं स्वतंत्र राज्य जाहीर केलं


### पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

जावं, तिथलं 'व्हॉईस ऑफ अमेरिका' रेडिओ-केंद्र बंद केलं जाव, मित्रराष्ट्रांनी पश्चिम बर्लिनमधले आपापले सर्व कार्यक्रम बंद करावेत वगैरे अटींना रशिया ठामपणे चिकटून आहे. तर दुसरीकडे प. बर्लिन-प. जर्मनी ह्यांच्यातल्या निर्वेध दळणवळणाची रशियन हमी, प. बर्लिनला प. जर्मनीचा अविभाज्य भाग म्हणून मान्यता, प. बर्लिनवासियांना पूर्व बर्लिन व पूर्व जर्मनीतल्या नातेवाईकांना भेटण्याची मुभा वगैरे आपल्या मुद्द्यांपासून तसूभरही हटायला तयार नाहीत. बड्यांच्या ह्या तणातणीत, बर्लिनवासियांची अवस्था मात्र 'बर्लिन भिंती'नं केविलवाणी करून सोडली आहे !

## बिच्चारा !

फरान्समधल्या आरमंड पोर्टनॉय् ह्या एका गॅरेज मालकाच्या मागे एक चमत्कारिक दुखणं लागलंय. अवघ्या काही दिवसात त्याचं विश्व दुःखद होऊन गेलंय. घाणेरडे निनावी फोन्स, कुत्सित टोमणे, हिडीस विनोद ह्यामुळे हा बिचारा गॅरेज मालक शेवटी दाद मागण्यासाठी कोर्टाकडे धावला आणि 'Portnoy's Complaint' ह्या फिलीप रॉथच्या मूळ अमेरिकन कादंबरीच्या फ्रेंच आवृत्तीवर बंदी घालण्याची त्यानं मागणी केली. निदान कादंबरीच्या नायकाचं नाव तरी बदलावं असं त्यानं आवर्जून सांगितलं. कोर्टानं मागण्या फेटाळल्या, पण आरमंड पोर्टनॉयनं अब्रूनुकसानीची फिर्याद करावी असं मात्र सुचवलं.

ह्याचं मूळ असं आहे-फिलीप रॉथच्या 'पोर्टनॉय कम्प्लेंट' ह्या कादंबरीचा नायक आहे पोर्टनॉय. गुन्हेगार प्रवृत्तीचा, लिंगपिसाट वकील असं त्याचं चित्र रंगवलं गेलं आहे. आरमंड पोर्टनॉय्प्रमाणेच वरील कादंबरीचा नायकही 'ज्यू'च दाखवला गेला आहे. ह्या साऱ्याचा कळस म्हणजे पोर्टनॉयच्या भागिदाराचं नाव व्हिक्टर ब्रॅनली दाखवलं गेलं आहे आणि फ्रेंचमध्ये ब्रॅनलर म्हणजे हस्तमैथून ! ह्या साऱ्यातून वर उल्लेखिलेली उपेक्षा गॅरेजमालकाच्या वाटयाला आली. वैतागलेला आरमंड पोर्टनॉय म्हणतो, '... माझ्या पत्नीनं हे पुस्तक वाचलं तेव्हा तिला मूर्च्छाच आली ...सॉरबॉनमध्ये माझ्या दोन मुली शिकतात. त्यांच्या वाटेला लाजिरवाणी थट्टा आली. 'काय हे तुमचे वडील' असं सारखं त्यांना हिणवलं जातंय .....

□ □ □

शिवऱ्या ऽऽऽ रं ऽऽ! तुजा सावला ऽऽऽ!
काहा म्हन्लां ? सावला ? काहा ऽऽ बोल बा ऽऽ नाम्या ऽऽ!
दिस उदेला सावला उटला नय, शिवऱ्या !
आँ ऽऽ काहा झालां ? काहा झालां ? ...

# मसण-मिरासी

बाळ बेंडखले

सावरीनं लाललाल पाकळ्यांचे कोश टाकून वरेच दिवस झाले होते. उरल्या राखाडी देठावरची हिरवी बीजकळी मोठी होऊन, पांढऱ्या ततूचे फुलोरे सांभाळत वाऱ्यावर डुलत होती, धावत होती. भर दुपारच्या रणरणत्या धुळीत ते फुलून निघत होते. तोंडातली लाळ थुंकताक्षणी तिची पापडी बनत होती. मग अन-वाणी त्या धुळवटीवरून उगीच कोण कशाला आपले पाय पोळून घेईल ? वाराही सावलीला दडला होता.

तशातही शिवऱ्या किलकिले डोळे करून कुड्याच्या पानाची चिलीम थोडी दूर सारून बघत होता. त्याच्या नजरेत आनंदही होता, वैतागही ! ...लांब उतारावरून पाच दहा माणसं त्याच्याच दिशेनं येताहेत हे ओळखायला त्याला क्षण काही लागला नाही. या रस्त्याला येणारी सगळी माणसं टाळमृदंगाच्या गजरात येत. सारीच अनवाणी आणि बोडकी.

शिवऱ्या जरा सांभाळून बसला.

"बरां झालां !"

उतार संपवून रस्ता नदीच्या दिशेला वळला, मग थोडा प्रवाहाबरोबर सलगी करीत वरूनच धुळवट उडवीत त्या पाच दहा जणांना घेऊन शिवऱ्यापावेतो येऊन पोचला.



कुणीसं दुरूनच त्याला हाकारलं,

"वो शिवऱ्या, खड्डा खणायला चल्–"

वाळल्या कारंजावर पिंपळ-वडाचा पार होता तिथंच तेवढी सावली होती. बडाबडा बोलणारी माणसं तिथं ढोपरावर माना टाकून तोंड बांधून बसली होती. त्यांच्या नजरेत सावली होती कुठे ?

उगीच स्वत:भवती फिरून दाखवल्याजागी निर्जीव दृष्टी टाकत शिवऱ्यानं मान डोलावली. मुरमाड मातीत करगोटाभर खड्डा खणायला शिवऱ्याला वेळ लागला नव्हता. मग ते सगळे दगड, काटेकुटे तुडवीत तिथवर आले. कुणी मातीच्या

ढिगाऱ्यावर उभे राहिले, कुणी एक खाली खड्डयात उतरला. बाकीच्यांनी कोंडाळं केलं.

मातीची मऊसर गादी नि त्यावर एक वस्त्र पसरलं गेलं...जाडंभरडं वस्त्र बाजूला सरलं, पाच-सहा महिन्यांची रेशमी लडी केळीच्या पानातून खाली पोचवली गेली. सगळं संपलं! मन नसलेले हात त्यावर माती ढकलायला थबकलेच होते!

"कवा पास्नं बसून ऱ्हायलां? आटपा लक्कन्...!"

शिवऱ्याला थोपवीत एकजण म्हणाला–

"सबूर रे जरा...भारी लोभ केलाय त्यावर! येकडाव डोळे भरूं पाहू दे!!"

कुणीसं म्हटलं,

"ते पायातले वाळे, हातातले केरवे, सुकली काढून घे!"

"नको, नको...विश्रामा...!" तो कळवळून म्हणाला.

"नको कसं? गळचाला फास बसल नां? ते गळचातलं पानसुद्धा काढ!"

"असू दी रे...असू दी...!"

"कशाला असू दी?"

"काहाला असू दी? मायचा, म्हने भारी फाडफाड! आरं, माया करीतो त्यो कुनावर? का फुकाचा त्येचा बोलना?"

शिवऱ्या घमेल्यात माती भरून देत म्हणत होता. त्याचं सारं लक्ष त्या रेशमी लडी-पेक्षा गळचातल्या पानावर खिळलं होतं. ते सोन्याचं होतं. चकाकत होतं.

दुःखाचे आवंढे गिळीत घाई करून माती देऊन झाली. उरल्या मातीचा ढीग रचला गेला. शिवऱ्यानं दुसऱ्या एका ढिगाऱ्यावरनं भला थोरला धोंडा लोटत लोटत आणून त्यावर गपकन बसवला. कपाळावरली घामाची धार पुशीत तो म्हणाला–

"येवढा करन्याचा कारान कुनी कोलंकुत्रं उकरून काढू नये. जावा आता."

तसल्या तापल्या धुळवडीवरून रेंगाळत रेंगाळत रस्ता त्यांना आपापल्या घरी घेऊन गेला.

ती सगळी दिसेनाशी झाल्यावर शिवऱ्या मुरमाड मातीचा चढ चढून आपल्या झोपडयात गेला. त्याचा सावळा आंब्याच्या बुंध्याशी कैऱ्या कुरतडत बसला होता. नागोडा! बापाला पाहाताच तो त्याच्याकडे धावला. त्याला कडेवर घेत त्यानं त्याच्या गळचातल्या पेटीला हात लावला. आंबाडयाच्या दोरातल्या हरणाच्या कातडी पेटीलगती सावळचाच्या गळचात त्याला आता एक सोन्याचं पान दिसू लागलं.

सांजची गुरं सोडल्यावर शिवऱ्या आंब्याच्या बुंध्याशी बसला होता. झोपडीच्या दारात त्याची बायको विठा बसली होती. तिच्या गळचात, हातात सोन्याचे ठाक-ठाक दागिने होते. ती शिवऱ्याची मिळकत होती. अस्तानकडनं विठाचा कुणी सगा

आला होता, त्याच्याशी ती बोलत होती. शिवऱ्याला त्याच्याशी बोलायला वेळ नव्हता.

दुसरा दिवस मसणवटीत कुणाला लाकडं दे, कुणाचा खड्डा खण, कुणाचा रेडा सोल असा निघून गेला. तिसरा, चवथा दिवसही गेला. तरी रोज दुपारच्या भडकत्या उन्हात तो मसणवटीत यायचा, थोडा वेळ हातवारे करायचा, निघून जायचा. तिथल्या मातीकडं पाहून म्हणायचा,

"धरित्रीमाते सांभाळून ठेव ग माझी ठेव !"

दहाबारा वेळा डोक्यावरची सावली पायदळी येऊन गेली.

शुक्रच काय तो तेवढा त्या दिवशी प्रकाशत होता. बाकीच्या उगीच किणकिण्या. वडपिंपळाची गंभीर सळसळ, नदीतल्या मासोळीची उसळी, क्वचित कुठं करकोच्याच्या घास बसल्या आवाजाला टिटवीचं टिटिवणं एवढाच आवाज. शिवऱ्याच मात्र ती स्वतःच बसवलेली बैठी धोंड बाजूला सारून खणू लागला होता, तेवढ्यातच काय तो वेगळा आवाज वातावरणात वलय उठवून गेला. भराभरा त्यानं हे काम केलं, आटोपलंही ! आता तिथं पंधरवड्यापूर्वीची ती रेशमी लडी राहिलीच होती कुठं ? किड्यांनी ती कधीच पोखरून टाकली होती ! गळ्यातलं पान, सुंकलं, वाळे शिवऱ्यानं बिब्ब्याची बोंडं ओरबाडावीत तसे ओरबाडून काढले, बटव्यात भरली अन् पुन्हा माती लोटून जिथल्या तिथं धोंडा होता तसा बसवीत तो स्वतःशीच पुटपुटला,

"कोनी म्हन्लं का हा काम कोन्चा त् म्हनल् कोल्याचा !"

शिवऱ्या घरी आला तेव्हा कवाडी उघडीच होती. त्यानं बुधला पेटवून पाहिलं सावळ्या अंगठा तोंडात घालून शांत झोपला होता. शेजारी विठा पहुडली होती. तिला न हलवताच त्यानं ते सोन्याचं पान सावळ्याच्या गळ्यात अडकवलं. सकाळी विठाला आकरीत वाटावं असं त्याच्या मनात होतं.

सकाळी चहाचा घोट घेता घेता सावळ्या आईला येऊन बिलगला. दोघांनी एकमेकाकडं पाहिलं. शिवऱ्या खुशीत आला, ती संधी साधून विठा म्हणाली,

"नाम्यासंगं अस्तानले माहेरी जाती म्हन्ते ! काहा रे नाम्या ?"

बाहेर होता तो नाम्या आत आला.

"हा ! औशीकडं जाईल, पुनवडीला योल घरा, काहा ?"

"हा, जावा. सावल्याले जतनं हां म्हन्तो !"

रात्री सगळी तयारी झाली. विठानं सगळे दागिने उतरून नीट गुरुफटून नळ्यात ठेवले. अगदी जपून. सावळ्याच्या गळ्यातलं पान मात्र आग्रहानं तसंच ठेवलं बोचकी डुईवर चढली. तिघं निघालो. नाम्या, विठा अन् सावळा. माहेर तर जवळच होतं. सरळ आंबवली घाटानं वर गेलं तर अस्तान अगदी तीनचार कोसावर...

ह्या काळोख्या आठ दहा रात्री शिवऱ्या लांबलांब मजल मारून आला. रात्रीची

एकही खेप वाऱ्यावर गेली नाही. काळच्या रात्रीची त्याची ती कमाईची वेळ होती, मग पुढं पुनवेच्या अगंमागं सगळं थंडावायचं... वज्रटिका, बांगड्या, मंगळसूत्र. भांडी, अंगठ्या, जोडवी असं काय काय जमून बोवली नि नळ्या भरून गेल्या. प्रेतं उकरण्याचा त्याचा खरा धंदा ! या धंद्यात असणारानी आपापल्या वाट्याची मसणवटं तेवढं च फिरायची असा जातकुळीचा इमान ! शिवऱ्याच्या वाट्याला हा भाग आलेला. चोरदाची घाटी साडली की वरचा भाग काही त्याच्या वाट्यातला नव्हता.

आंब्याच्या बुंधाशी शिवऱ्या डोळे मिटून त्या रात्री कुठं जायचं त्याची अटकळ बांधीत बसला होता. समोरच्या शेताडीतन मृगजळ लहालहा धावत होतं, लेण्याचा डोंगर तर ज्वालेत बसल्यासारखा दिसत होता. एखादी वावटळ गरागरा करीत बगवेल करवंदीच्या झुडुपाशी तर कधी सावरीच्या बोंडांशी सळसळायची. गु॰फटा-यची बोंडातून ते कापसाचे फुलोरे एकाच दिशेनं भराभरा बाहेर पडायचे. अटकळ पक्की झाल्यावर त्यानं डोळे उघडले. मावळतीकडलं जाबुर्ड धरावं. मसणवट आडवळणाला आहे. सावल्यांवर झाडझुडुपं उभी राहिलेली त्याला दिसली. तंबाखूसाठी बटव्याला हात घालता घालता समोरून कळकीच्या वाटेनं त्याला नाम्या ये॰ाना दिसला. निथळला होता घामानं. दुरूनच त्यान शिवऱ्याला साद घातली हात उंचावून,

' शिवऱ्या ऽऽऽरंऽऽ ! तुजा सावला ऽऽऽ !"

" काहा म्हन्लां ? सावला ! काहाऽऽ बोल बाऽऽ नाम्याऽऽ !"

" दिस उदेला सावला उटला नय, शिवऱ्या !"

लहान मुलांसाठी उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

" आं ऽऽ काह्य झालां ? काह्य झालां ? "

शिवऱ्या दुडमडला !

नाम्या त्याच्याचवळ जात समजुतीनं त्याला निघायला सांगत बोलला,

" पान लागूनशान इखार झाला ! इठाबी बोलंना, शिवऱ्या ! रडूं नय् आरं होना ता झालां. दिनार–निनार येव हाय. चल बगु लवकन ! "

चोर पऱ्ह्या, कुडोशी, आंबवलीची घाटी बोलबोल म्हणता पावलानी पार आधाश्यासारखी गिळली. पायांच्या अंगठ्यावरनं नजर तेवढी नाचत होती मागपुढं... !

वेताळाच्या धोंड्याला वळसा घालून वाट सरळ गिरम्याच्या घराशी थांबली. त्याचं नळीचं घरटं जातकुळीच्या बायानी भरलं होतं. रडारडीनं छप्पर ऊंचावलं होतं

गिरम्या उकीडवा बसला होता. तो शिवऱ्याला पाहताच उठून पुढं झाला, समजावू लागला.

" पन आसा काह्य झाला गिरम्या ऽऽ ! काह्य कोपला माझा येव आसा ऽऽ! ".

समजावणीसाठीं शब्द अपुरे होते. लाडका लेक सावळा. एकुलता. तोही गेला. त्याचं दुःख शिवऱ्याच्या काळजाला भिडलं. विठाचा स्वर तर खाली येतच नव्हता.

गिरम्याची पोरं इकडं तिकडं नाचत होती. सावळ्याच्या बरोबरीचा हिऱ्या तिथंच होता. कुणाच्या गळ्यात मोत्ये, कुणाच्या गळ्यात साखळी. काहींना काही दागिना प्रत्येकाच्या अंगावर होताच. गिरम्या आपल्या धंद्यावर चांगली माया धरून होता. दोन्ही बायल्यांच्या अंगावर बोट बोट जाडीचे ठाव होते.

सावळ्यासाठी गिरम्यानं वेताळ धोंडीवर जवळची जागा शिवऱ्याला दाखवली. सावळ्याच्या आधीच गिरम्या, पांग्या, चकन्यानं खड्डा खणला. घोंगडीत गुरफटलेला सावळा धरणीमायच्या कुशीत जायला कधीचा तयार होता.

खड्ड्याच्या तळात पेंढी सोडीत चकन्या बोलला,

" शिवऱ्या ठीव त्येला...ढकल माती ! "

डोळे वाहू देत शिवऱ्या बोलला,

" थोप ! माह्य पवून दी !!

आणि दहा बारा दिवसामागची ती रेशमी लडी ह्याच्या डोळ्या पुढं उलगडली गेली.

तेव्हा तोही म्हणत होता,

" सबूर रे विश्रामा ! भारी लोभ लावला हुता त्याला ! "

त्याच्या गळ्यातले, पायातले, हातातले दागिने घसाघसा ओढून काढतानचा प्रसंगच उसळी मारून शिवऱ्याकडं बवू लागला. शिवऱ्याची नजर सावळ्याच्या

गळतल्या पानावर होती. एकदा त्याला त्याचा सावळा दिसे, एकदा त्याला तो केळीच्या पानातला रेशमी देह !

"नय्...ह्या आता व्हतां नय् ! ठीव तां तस्सा दोर. जावदी त्येच्या संगं !"

मान आडवी हालवत शिवऱ्या उघडपणं बोलला,

"गिरम्याऽ ! ल्हानगी उसबायची न्हायत पुना !!"

मूठमाती देऊन वर धोंडा ठेवता ठेवता अवघ्यांच्या आणाभाका झाल्या होत्या. राखण्या दगडाला मस्तक भिडवून अखेरीला गिरम्यानं आण घेतली,

"शिवऱ्या, पांग्या, चकऱ्या आन धितो. ल्हानगी उबसायची न्हायत म्हन्तो !"

बाकीचे उगीच खालीवर झाले होते.

त्या रात्रीच विठाला घेऊन शिवऱ्या, चकऱ्या परतले. दुसऱ्या दिवशी बटव्यातले, नळयातले सगळे दागदागिने त्यानं बाहेर काढले. रोज एक एक करून पंधरवडयात त्यानं सगळं जगबुडीला वाहिलं. नेहमीचा मासे धरणारा कोळी हळूहळू जाळे धरीनासा झाला ! कवळ काठी करून विठा आणि शिवऱ्या फुंकून फुंकून दिवस ढकलू लागले होते...

जगबुडीला नियमानं खारंपाणी सरसरून फुगत होतं. निचरून जात होतं. सावरीनं हाताला पालवी बांधली होती. वडापिंपळाची पिवळी लाल मोत्ये–माणकं झरू लागली होती. वड, आमानी, पळस, कुडा अशा पानांची रास आलटून पालटून आंब्याखाली पत्रावळीसाठी पडू लागली व टोचे देत देत, पानावर पान टोचत दोघांचे दिवस ह्या हातावरचे ह्या हातावर निघून चालले !

सांजवायला झालं होतं. नदीवर मासेमारांची चाहूल ऐकू येत होती. पाग खांद्यावर टाकून शिवऱ्या रात्रीसाठी इडुकमिडूक मिळवायला निघाला तर विठा म्हणाली,


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

" रातीचा जाना काहा करितो ? लक्कन् येरं बा !"

मागल्या बांधावरनं शिवऱ्यानं उडी घेतली तेवढ्यात कळकीच्या वाटेनं चकऱ्या आरडला,

" रे शिवऱ्याऽऽऽ ! थोप् ! अस्तानले बलवन हाये !

" काहा रे काम ?" झोपडीच्या दाराशी येऊन विठानं विचारलं.

" नय्...पन गिरम्याले घरा प्वार बोलंनय...!"

" भाजा रं पुता ! कुनचा प्वार ?"

" काहा झाला ?" जाळं खुटाऱ्याला अडकवीत शिवऱ्या विचारीत होता,

" कोन हिरक्या का रं ?"

" हा, किरडू लागलं, जातीचं हल्दीवानी. योक ल्हर आली पघ, मंग ताटच !"

" बा ऽऽ बारं ऽऽऽ !" विठा कळवळली.

सावळा आणि हिरक्या एकाच दिवसाचे होते.

चूड पेटवून दोघे अस्तानला निघाले. रात्र काळोखाची होती. आकाशगंगेचा फाकला पट्टा डोईवर होता. उत्तरेला सप्तर्षी ध्रुवाभंवती फेर धरण्याच्या पवित्र्यात होते. मृगही दिसत होता. रसाळगडाच्या दक्षिणेचा सांबऱ्याबुरूज छाती काढून उभा होता. मध्यरात्रीनंतर वारा वाहू लागला. चूड फडफडू लागली तोवर ते वेताळ घोंडीपाशी आले होते.

शिवऱ्या क्षणभर थांबला. सावळ्याचा राखण्यादगड त्याला दिसत होता. वाऱ्यानं झुडूप सळसळावं तसं त्याचं मन सळसळलं.

गिरम्या कपाळाला हात लावून बसला होता. नजर होती हिरक्यावर. काळा ठिक्कर पडलेला त्याचा देह ! चूड गौऱ्याच्या हाती देऊन शिवऱ्या आत जाऊन हिरक्या शेजारी बसला. गालावरून हात फिरवून त्यानं मुका घेतला.

" माजं सावलं तं !" असं म्हणून तो उठला. पायाशी इकडं तिकडं पोरंठोरं रडून रडून मुरकुंडी करून पडलेली होती.

हातात चूड धरून गिरम्याचा दहा बारा वर्षांचा मुलगा गौऱ्या उपडी मांडी घालून दाराजवळच बसला होता. त्याच्याकडं शिवऱ्याचं बाहेर पडता पडता लक्ष गेलं नि शिवऱ्याचं काळीज पा ऽऽऽ र कापलं !


स्वतःच्याच तोंडावर आपली मूठ शिवऱ्यानं जोरात दाबली तरी घोगरा कंठ फुटला.

" गिरम्या ऽऽऽऽ !"

गौऱ्याच्या गळ्यात सावळ्याच्या गळ्यातलं सोन्याचं पान होतं !

◻ ◻ ◻

# पराजित – अपराजित



**वि. स. वाळिंबे** **लेखांक : बावीस**

हिटलरच्या धडाडीने नवी झेप घेतली होती.

स्वीडनमधून होणारा लोखंड पुरवठा अबाधित रहावा यासाठी हिटलर डेन्मार्क आणि नॉर्वे यांची तटस्थता एक दिवस लाथेने ठोकरून लावणार आहे ही गोष्ट ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या तत्कालिन नेतृत्वाला माहीत नव्हती असे नाही. त्यासाठी नार्विकसारख्या महत्त्वपूर्ण नॉर्वेजियन बंदरापाशी ब्रिटिश युद्धनौका येऊन दाखल झाल्यालाही बरेच दिवस होऊन गेले होते. उत्तर समुद्रामध्ये ब्रिटिश नौदल गस्त घालीत हिंडत होते. परंतु नॉर्वे आणि डेन्मार्क यांच्या भूमीवर प्रत्यक्ष पाऊल ठेवण्याचे ब्रिटिश आणि फ्रेंच लष्कराला धैर्य झालेले नव्हते.

तसे व्हायला दोन कारणे होती. एक तर, युद्ध जिंकायचे असेल तर लष्करी धोके पत्करायला तयार असले पाहिजे एवढी तडफ ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या लष्करी सूत्रधारांना अपरिचित होती. जनरल गामेलिनसारखा फ्रेंच पायदळाचा प्रमुख तर युद्धासंबंधी पहिल्यापासूनच मरगळलेला होता. हिटलरला ओळखण्याच्या बाबतीत नॉर्वे आणि डेन्मार्क यांची फसगत झाली हे दुसरे कारणही तितकेच महत्त्वाचे होते. ऑस्ट्रिया, चेकोस्लोव्हाकिया आणि पोलंड यांना हिटलरचा कसा

अनुभव आला हे नॉर्वे-डेन्मार्कने पाहिले होते आणि तरीही, हिटलर आपल्या तटस्थतेचा भंग करणार नाही असा विश्वास वायव्य युरोपमधील ही दोन्ही राष्ट्रे व्यक्त करीत होती. स्वीडन आणि जर्मनी या मित्रराष्ट्रांच्या दरम्यान आपण उभे असल्यामुळे आपली इच्छा नसली तरी देखील या युद्धाच्या आवर्तात आपण खेचले जाणार आहोत हे नॉर्वे आणि डेन्मार्क यांना कळायला हवे होते. त्यांची ही समजूत हिटलरनेही आपली तयारी पूर्ण होईपर्यंत कटाक्षाने जपली होती.

त्यामुळे नऊ एप्रिलच्या पहाटे, जर्मन रणगाड्यांचा कर्कश आवाज ऐकू येताच, शरणागती स्वीकारण्याशिवाय चिमुकल्या डेन्मार्कला गत्यंतर उरले नव्हते. याच वेळेला जर्मन विमानदल ट्रॉंडहेम्, बर्जेन स्टाव्हांजेर या नॉर्वेजियन बंदरात आपले सैन्य उतरवीत होते. त्याचप्रमाणे या विमानदळाने नॉर्वेतील सर्व विमानतळ आपल्या ताब्यात घेतले आणि मग जर्मन पायदळाची ओस्लो या राजधानीच्या रोखाने घोडदौड सुरू झाली.

नॉर्वेवरील हिटलरच्या आक्रमणाला प्रारंभ झालेला आहे ही बातमी फ्रेंच प्रधानमंत्री रेनॉ याला सकाळी आठ वाजता कळली. लागलीच तो आपल्या कचेरीत गेला आणि नॉर्वेचा नकाशा मेजावर ठेवून, हिटलरच्या सैन्याला रोखण्यासाठी आपल्याला कोठे सैन्य उतरविता येईल याचा विचार करू लागला.

वीस एक मिनिटांच्या आतच जनरल गामेलिन तेथे येऊन पोचला. त्याच्या चेहेऱ्यावर किंचितही व्यग्रता दिसत नाही हे पाहून रेनॉ याला आश्चर्य वाटले. तरीदेखील आपल्याला तातडीने काय केले पाहिजे यासंबंधी गामेलिन सल्ला देईल अशी त्याची अपेक्षा होती. पण तेही घडले नाही. शेवटी न राहवून रेनॉ याने गामेलिनला विचारले, ' तुमच्या लष्करी कचेरीकडे आणखी काही बातमी आली आहे काय ?"

" नाही."

" आपण आता काय केलं पाहिजे असं तुला वाटतं ?"

" तुम्ही इतकं गांगरून जायचं मुळीच कारण नाही. नॉर्वेजियन सरकारनं तर आपल्याला काहीच कळविलेलं नाही. त्यामुळे युद्धातली एक साधी घटना यापेक्षा या बातमीला अधिक महत्त्व कशासाठी द्यायचं ? एकदा युद्ध सुरू झालं की अशा अनपेक्षित घटना घडत असतातच."

" नॉर्वे-डेन्मार्कवरचं हिटलरचं आक्रमण ही तुला अनपेक्षित घटना वाटते ?" रेनॉ याने विचारले.

या प्रश्नाला गामेलिन याने उत्तर दिले नाही.

डोंगराळ प्रदेशातील युद्धासाठी तयार करण्यात आलेली डिव्हिजन नॉर्वेला धाडण्यासाठी गामेलिनने बेस्ट येथे आणून ठवलेली असावी अशी रेनॉ याची कल्पना

होती. म्हणून त्याने गामेलिनला विचारले, "बेस्ट इथली डिव्हिजन केव्हा रवाना होणार आहे?"

यावरचे गामेलिनचे उत्तर मासलेवाईक होते. तो म्हणाला, "ती डिव्हिजन दक्षिण फ्रान्समध्ये आहे. बेस्ट इथं येऊन पोचायला तिला अजून दोन दिवस लागतील."

हे उत्तर ऐकल्यानंतर रेनॉचा आवाज चढला. तो म्हणाला, जनरल गामेलिन, ब्रिटननं आपल्या वतीनं लढावं अशी का तुझी अपेक्षा आहे? ते जाऊ दे. मी काय सांगतो ते नीट ऐक. नॉर्वेजियन बंदरांमध्ये सैन्य उतरविताना आपल्याला हिटलरच्या सैन्याशी लढावं लागणार नाही अशी कल्पना करून आपण सारी योजना आखली होती. आता ती सारी बंदरं हिटलरच्या ताब्यात गेली आहेत. म्हणून दुसरीकडे कुठं सैन्य उतरविता येईल याचा विचार व्हायला हवा."

गामेलिन शांतपणे उत्तरला, "इतकं उतावीळ व्हायचं काहीच कारण नाही. अजून नॉर्वेमधल्या परिस्थितीचं तपशीलवार वृत्त हातात यायचं आहे. एकदा हिटलरचं तेथलं धोरण कळलं की मग आपण काय करायचं हे ठरविता येईल."

गामेलिनशी अधिक बोलण्यात काहीही अर्थ नाही हे रेनॉ याला कळून चुकले. नॉर्वेवरील जर्मन आक्रमणाची बातमी कळताच तो अस्वस्थ झाला होता. परंतु त्यापेक्षाही गामेलिनची थंड वृत्ती त्याला असह्य झाली होती.

नऊ वाजता राष्ट्राध्यक्ष लेब्रन याच्या एलिसे प्रासादामध्ये मंत्रिमंडळाच्या युद्ध समितीची बैठक भरणार होती. या बैठकीला जाताना रेनॉ युद्ध समितीचा सचिव बोदों याला म्हणाला, "गामेलिन युद्धनेता वाटतच नाही, शांति-प्रवचनं झोडणारा धर्मोपदेशकच आहे तो. त्याची ही वृत्ती मला बिलकुल पसंत नाही."

युद्धसमितीतील बहुतेक सदस्य गामेलिनसारखेच थंड होते. राष्ट्राध्यक्ष लेब्रनही, नॉर्वेतील युद्धाची जबाबदारी मुख्यतः ब्रिटननेच स्वीकारली पाहिजे याच मताचा होता. त्यामुळे युद्धसमितीच्या बैठकीत, ब्रिटनवर आता किती जबाबदारी पडली आहे यासंबंधीच अधिक चर्चा झाली. त्यामुळे, नॉर्वेतून जर्मन सैन्याला बाहेर काढण्यासाठी काय केले पाहिजे यासंबंधी ब्रिटिश नेत्यांशी विचारविनिमय करण्याकरिता प्रधानमंत्री रेनॉ, संरक्षणमंत्री दलादिए आणि नौदलप्रमुख अॅडमिरल दरलॉ यांनी दुपारी लंडनला जावे असे या बैठकीत ठरले.

पॅरिसमध्ये फ्रेंच युद्धसमितीची बैठक चालू असतानाच नार्विक हे बंदर जर्मन सैन्याच्या हातात पडले होते. त्याचप्रमाणे राजे हाकोन यांचे सरकार ओस्लोमधून बाहेर पडून त्याने उत्तरेकडचा रस्ता धरला होता. नॉर्वेच्या लढाईत हिटलरने आपल्या विमानदलाचा अतिशय कौशल्याने उपयोग केला. त्यासाठी त्याने प्रथम नॉर्वेतील सर्व विमानदलांवर आपले पहारे बसविले. त्यामुळे नॉर्वेमध्ये विमानातून सैन्य उतरविणे अँग्लो-फ्रेंचांना सर्वस्वी अशक्य झाले. ब्रिटनचे नौदल जर्मन नौदला-

पेक्षा अधिक समृद्ध होते हे खरे. परंतु नॉर्वेच्या किनाऱ्यापाशी आलेल्या ब्रिटिश जहाजांवर जर्मन विमानांतून अविरत बाँबवर्षाव होऊ लागल्यामुळे या जहाजांवर असलेले सैन्य बंदरापर्यंत पोचविणे ब्रिटिश नौदल अधिकाऱ्यांना जमणे शक्य नव्हते.

हवाई दलाने नौदलावर निर्णायक मात केल्याचा युद्धशास्त्राच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता. रणगाडे आणि विमाने यांच्या उपयोगामुळे युद्धशास्त्रातील जुने संकेत पार कोसळले आहेत असे द गॉल आपल्या वरिष्ठांना वारंवार सांगत होता. त्याचा प्रत्यय आता आला होता. जर्मन रणगाड्यांनी पोलंडला नेस्तनाबूत केले तर जर्मन विमानांनी नॉर्वेची अल्पावधीत नाकेबंदी केली.

हिटलरचे हे विद्युत्वेगी युद्धतंत्र इतके प्रभावी ठरले होते की अवघ्या नऊ हजार सैनिकांच्या बळावर संपूर्ण नॉर्वेजियन किनारपट्टी आपल्या वर्चस्वाखाली आणणे त्याला सहज शक्य झाले. पहाटे पाच वाजता जर्मन विमानांतून नॉर्वेच्या भूमीवर पहिली सेनापथके उतरली आणि त्यानंतर सात-आठ तासांच्या अवधीतच रक्ताचा एक थेंबही न सांडता, नॉर्वेच्या बऱ्याचशा भागावर हिटलरचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते.

हिटलर युद्धतंत्रामध्ये हे असे नवनवे प्रयोग करीत असताना आणि या नव्या युद्धतंत्राची यशस्विता अजमावण्यासाठी धोके पत्करीत असताना फ्रेंच सेनानींनी स्वस्थ बसावे ही गोष्ट रेनॉसारख्या नव्या दमाच्या प्रधानमंत्र्याला मंजूर होणे शक्यच नव्हते. म्हणून त्याने पंधरा एप्रिलला संरक्षणमंत्री दलादिए याला पत्र लिहिले. या पत्राच्या शिरोभागी 'गामेलिन आणि अॅडमिरल दरलाँ यांच्याही माहितीसाठी' असे लिहिले होते. या पत्रात रेनॉ याने म्हटले होते–"जर्मन लष्कर ज्या वेगाने नॉर्वेच्या किनाऱ्यापासून आतल्या भागात घुसले ते पाहून आपल्या सेनानींनी आश्चर्य व्यक्त केले आहे. परंतु हे असे का घडले आणि जे घडले आहे त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आपण काय केले पाहिजे याचा विचार करायची त्यांना गरजच वाटत नाही याचे मला वाईट वाटते. खरे म्हणजे ज्या दिवशी नॉर्वेवरील हिटलरच्या स्वारीची बातमी कळली त्याच दिवशी आपले सैन्य नॉर्वेच्या दिशेने रवाना व्हायला हवे होते. परंतु सेनानींच्या निष्क्रियतेमुळे तसे काहीच होऊ शकले नाही. नॉर्वेतील लढाईला फार महत्त्व आहे ही गोष्ट गेली अनेक वर्षे लष्करात काढलेल्या आपल्या सेनानींच्या ध्यानात येऊ नये याला काय म्हणायचे! नॉर्वेतील लढाईवर युरोपीय युद्धाचे भवितव्य अवलंबून आहे हे संरक्षमंत्री या नात्याने तुम्ही लक्षात घ्यावे. म्हणून आता केवळ नॉर्वेच्या पश्चिम किनाऱ्यावरील दोन-चार बंदरे ताब्यात घेऊन भागणार नाही. हिटलरला युद्ध चालविणे अशक्य करून सोडायचे असेल तर अँग्लो-फ्रेंच सैन्याने नॉर्वे ओलांडून स्वीडनमधील लोखंडाच्या खाणीही आपल्या ताब्यात घेतल्या पाहिजेत. याबाबतीत दिरंगाई होता कामा नये. उद्या सकाळीच आपले सैन्य नार्विकच्या दिशेने कूच व्हायला हवे."

परंतु एवढी तातडी करणे जनरल गामेलिन आणि अॅडमिरल दरला यांच्या स्वभावात नव्हते. जर्मनीने तीन डिव्हिजन सैन्य नॉर्वेत आतापर्यंत ओतले होते आणि आणखी चार डिव्हिजन सैन्य तेथे ओतण्यात येणार होते. हे सारे गामेलिन आणि दरलॉ यांना माहीत नव्हते असे नाही. तरीदेखील त्या दोघांनी रेनॉ याला कळविले— " दर महिन्याला जास्तीत जास्त एक डिव्हिजन सैन्य नॉर्वेकडे धाडणे आपल्याला शक्य होईल."

गामेलिनचे हे उत्तर आले त्यावेळी रेनॉच्या कचेरीत बोदों बसला होता. रेनॉ त्याला म्हणाला, " कणा नसलेला आणि नेहमी तत्त्वज्ञाच्या आविर्भावात बोलणारा गामेलिन यापुढे सरसेनानीपदावर ठेवणे म्हणजे फ्रान्सनं आपण होऊन आपला विनाश करून घेण्यासारखं ठरणार आहे."

रेना याने गामेलिनसंबंधीचे आपले हे मत बारा एप्रिलला भरलेल्या युद्धसमितीच्या बैठकीतही बोलून दाखविले होते. त्यावेळी आपल्या सहकाऱ्यांना तो म्हणाला होता, " हिटलरनं नॉर्वेवर चढाई केल्यावरही आपले संरक्षणमंत्री शांत आहेत. मी काही त्यांना सांगायला गेलो तर ते " असं काय मोठं घडलं आहे की त्यामुळे आपण घाबरून जावं ? " असा मलाच उलट प्रश्न विचारतात. अशा या माणसाला यापुढेही सरसेनानीपदावर ठेवलं तर परमेश्वरदेखील फ्रान्सला वाचवू शकणार नाही."

रेनॉ याच्या या परखड उद्‌गारानंतर युद्धसमितीचे इतर सभासद गप्प बसले. एकटा दलादिए तेवढा चुळबुळ करीत होता. कोणीच बोलत नाही हे पाहून तो म्हणाला, " सरसेनानीसंबंधीची प्रधानमंत्र्यांची टीका मला बिलकूल मंजूर नाही हे मला स्पष्टपणे सांगितलंच पाहिजे. नॉर्वेमधील लढाई ही मुख्यतः नाविक स्वरूपाची असल्यामुळे तिची जबाबदारी ब्रिटननं उचलली पाहिजे. उगाच गामेलिनवर आग-पाखड करण्यात काहीच अर्थ नाही. ब्रिटनकडून हलगर्जीपणा होत आहे याबद्दल कोणीच काही बोलत नाही. म्हणून यापुढेही जर गामेलिनवर अशीच टीका होणार असेल तर या युद्धसमितीच्या बैठकींना मी हजर राहणार नाही."

ही बैठक चालू असताना नेहमीप्रमाणे गामेलिन, दरला आणि वुलेमिन हे अनुक्रमे पायदळ, नौदल आणि विमानदल यांचे प्रमुख बाहेरच्या व्हरांड्यात उभे होते. बैठकीचे कामकाज आटोपले की बैठकीत काय ठरले हे त्यांना कळविण्यासाठी आत बोलाविले जाई. त्याप्रमाणे यावेळीही त्यांना बोलावण्यात आले

रेनॉ याने गामेलिनला विचारले, " नॉर्वेतल्या लढाईबाबत तुम्ही काय करायचं ठरविलं आहे हे युद्ध समितीला कळलं पाहिजे."

" नॉर्वेतील लढाई ही आरमाराची जबाबदारी आहे. कारण आरमारानं नॉर्वेजियन बंदरं ताब्यात घेतल्याशिवाय आम्हाला काहीही करता येणार नाही. म्हणून आपण अॅडमिरल दरला यांना विचारावं हे बरं." गामेलिन उत्तरले.

दरला उत्तरला, " ब्रिटिश आरमार चढाई करण्याच्या बाबतीत टाळाटळ करीत

असताना आपण एकटे काय करणार ?"

रेनॉ याने पुन्हा गामेलिनला विचारले, "समजा उद्या ब्रिटिश आरमारानं चढाईचा पवित्रा घेतला तर नॉर्वेत उतरविण्याइतकं पायदळ आपल्यापाशी तयार आहे की नाही हा माझा प्रश्न आहे."

गामेलिनचे उत्तर ठरलेले होते—"नॉर्वेतील लढाईची जबाबदारी ब्रिटननं स्वतःकडे घेतलेली आहे. म्हणून त्याबाबतीत मी हस्तक्षेप करू शकत नाही."

रेनॉ म्हणाला, "तुमचं हेही म्हणणं मी मान्य करतो. परंतु तातडी करण्याबाबत ब्रिटनवर दडपण आणायची जबाबदारी तर आपली आहे ना ? आपण आपलं सैन्य नॉर्वेकडे रवाना केलं की ब्रिटनलाही स्वस्थ बसता येणार नाही."

सोयीस्कर उत्तर देण्याच्या बाबतीत गामेलिनचा हात कोणीच धरू शकत नव्हता. त्याने रेनॉला म्हटले, "आपण ब्रिटनसंबंधी असा अविश्वास दाखविणं बरं नाही असं मला वाटतं."

"ठीक आहे तुम्ही आता जाऊ शकता." असे म्हणून रेनॉने ही चर्चा थांबविली.

रेनॉ जोपर्यंत प्रधानमंत्री आहे तोपर्यंत त्याचे आणि आपले दररोज असे खटके उडणार हे गामेलिनच्या ध्यानात आले होते. त्यामुळे ही बैठक आटोपून कचेरीत परतताच त्याने आपला राजीनामा खरडला. संरक्षणमंत्री दलादिएला उद्देशून लिहिलेल्या या पत्रात गामेलिनने म्हटले होते—"जर्मनीविरुद्धचे युद्ध कसे चालवायचे या बाबतीत प्रधानमंत्र्यांशी माझे मूलभूत मतभेद आहेत. अशा परिस्थितीत माझ्यावर टाकण्यात आलेल्या जबाबदारीतून मला मुक्त करण्यात यावे."

गामेलिन तसा मोठा हुशार होता. रेनॉ आपला राजीनामा तात्काळ मंजूर करील हे त्याला माहीत होते. म्हणून तो हे पत्र घेऊन दलादिएकडे गेला. पत्र वाचल्यानंतर दलादिए त्याला म्हणाला, "तुझी अडचण मी समजू शकतो. माझंही रेनॉशी फार काळ पटणार नाही हे मला माहीत आहे. त्यामुळे तू राजीनामा दिलास तर मीही देईन. परंतु सध्याची परिस्थिती अशी आहे की आपण राजीनामे दिले तर लोक आपल्यालाच नावं ठेवतील म्हणून तू हे पत्र परत घे."

गामेलिन उत्तरला, "तुमचं म्हणणं मला मान्य आहे. मी आताच राजीनाम्याचा आग्रह धरत नाही. परंतु हे पत्र मी फाडणार नाही. पाहिजे तर तुम्ही तुमच्याजवळ ठेऊन द्या."

डेन्मार्कने न लढताच शरणागती स्वीकारली असली तरी नॉर्वे मात्र आपल्या तुटपुंज्या सेनेनिशी लढत होता. कर्नल रूजच्या नेतृत्वाखाली नॉर्वेजियन सेना उत्तर नॉर्वेमध्ये जर्मन सेनेशी झुंज घेत होती. एकदा का आपण ट्रॉंडहेम आणि बेर्जेन ही बंदरे जिंकून घेतली की आपल्याला मदत करणे ब्रिटनला शक्य होईल हे रूज यास माहीत असल्यामुळे त्याने आपली सारी शक्ती या दोन बंदरांच्या मुक्ततेसाठी पणाला लावली. रूजला आपण सैन्य आणि शस्त्रास्त्रे यांची मदत करू शकलो तर नॉर्वेतील

लढाई दीर्घकाळ चालू ठेवणे संभवनीय आहे अशा विचाराने ब्रिटिश नौदलही उत्तर समुद्रामध्ये घिरट्या घालीत होते. नार्विक बंदरांतून जर्मन लष्कराला पिटाळून लावले तर उत्तर नॉर्वेचे रक्षण करणे सोयीचे ठरेल हेही ब्रिटिश सेना कचेरीने ओळखले होते. परंतु नॉर्वेच्या मदतीसाठी ब्रिटनने धाडलेली सेना हिटलरच्या लष्करी सामर्थ्याशी मुकाबला करायला अपुरी होती आणि मुख्य म्हणजे उशीरही बराच झालेला होता. तरी देखील बराच प्रयत्न केल्यानंतर अठरा एप्रिलला ट्राँडहेमच्या नैऋत्येला शंभर मैलांवर असलेल्या अँडॉलस्नेस येथे एक ब्रिटिश ब्रिगेड उतरली. राजे हाकोन यांनी आपली हंगामी राजधानी येथेच थाटलेली होती. ट्राँडहेमच्या उत्तरेला ऐंशी मैलांवर नामसोस नावाचे छोटे बंदर आहे. तेथे वीस एप्रिलला आणखी एक ब्रिटिश ब्रिगेड आणि फ्रेंच सेनेच्या तीन बटालियन्स उतरल्या. अँडॉलस्नेस येथे उतरलेली ब्रिटिश ब्रिगेड कर्नल रूजच्या लष्कराला येऊन मिळाल्यामुळे रूज याने पुन्हा ओस्लोपर्यंत दौड मारली. कर्नल रूज ओस्लोजवळ येताच जर्मन विमानांनी त्याच्या लष्करावर असा काही जोराचा बाँबवर्षाव केला की त्याला ओस्लो शहरात पाऊल ठेवणे शक्य झाले नाही. नॉर्वेतील एकही विमानतळ ब्रिटिश लष्कराच्या ताब्यात नसल्यामुळे रूजच्या पथकांना हवाई संरक्षण देणे त्याला शक्य झाले नाही. नामसोस येथे उतरलेल्या अँग्लो-फ्रेंच सेनेची तीच गत झाली. जर्मन विमानांच्या माऱ्यामुळे तिला ट्राँडहोमपर्यंत मजल मारणे अशक्य झाले.

विमानतळाअभावी आपल्या लष्कराला नॉर्वेमध्ये काहीही हालचाल करता येत नाही हे ब्रिटिश युद्धकचेरीला कळून आल्यामुळे तिने सत्तावीस एप्रिल रोजी आपल्या लष्कराला माघार घेण्याचा आदेश दिला. त्यादिवशी रेनॉ लंडनमध्ये होता. ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या संयुक्त युद्ध समितीच्या बैठकीमध्ये बोलताना तो म्हणाला, " नॉर्वेतून सैन्य काढून घेण्याचा निर्णय आपल्यास फारच महाग पडणार आहे. एक तर त्यामुळे आपली राजकीय दिवाळखोरी दिसून येईल. शिवाय लोकांच्या मनोधैर्यावरही अनिष्ट परिणाम होईल."

यावर ब्रिटिश सेनानी उत्तरले, " नॉर्वेमध्ये धाडलेलं आपलं सैन्य आपण मागं घेतलं नाही तर ते नष्ट होऊन जाईल किंवा जर्मनांच्या कैदेमध्ये खितपत पडेल. अशा वेळी या सैन्याचं नाहक बलिदान करण्यात काहीच स्वारस्य नाही."

लष्करी तज्ञांचे हे मत रेनॉने मान्य केले. परंतु तो म्हणाला, " ते काहीही असलं तरी नार्विक बंदर ताब्यात घेण्याचा आपला प्रयत्न सुटू देता कामा नये. कारण नार्विक जर आपल्या ताब्यात आलं तरच आपल्याला स्वीडनमधून जर्मनीला होणारा लोखंड-पुरवठा अडविता येईल. शिवाय अँडॉलस्नेस येथून बाहेर पडावं लागलेल्या नॉर्वेजियन सरकारला नार्विक इथे आसरा मिळाला तर नॉर्वेजियन सेनेचा प्रतिकार कोसळणार नाही."

नॉर्वेची लढाई फसावी ही गोष्ट ब्रिटिश जनमतालाही मान्य झाली नाही.

चेंबर्लेनच्या कमकुवत धोरणापायीच हिटलरचे आक्रमण होण्यापूर्वी नॉर्वेजियन बंदरे ताब्यात घेण्याचे मूळचे धोरण कार्यवाहीत आले नाही असे जो तो म्हणू लागला. हाऊस ऑफ कॉमन्सच्या बैठकीमध्ये तर 'चेंबर्लेन अधिकारावर राहिला तर युद्ध जिंकण्याची आशाच नको' असे उद्‌गार ऐकू येऊ लागले. शेवटी दहा मे रोजी चेंबर्लेनने राजीनामा दिला आणि ब्रिटनच्या प्रधानमंत्रिपदावर विन्स्टन चर्चिलसारखा झुंजार नेता आरूढ झाला.

प्रधानमंत्रिपद स्वीकारताच चर्चिलने नार्विकच्या लढाईवर आपले लक्ष केंद्रित केले आणि त्याचा परिणामही लवकरच दिसून आला. अठ्ठावीस मे रोजी अँग्लो-फ्रेंच सेनेने नार्विक हिटलरच्या हातातून हिसकावून घेतले. परंतु पुढे आठ-दहा दिवसांच्या आतच पश्चिम आघाडीवरील परिस्थिती बिकट झाल्यामुळे नार्विक-मधील अँग्लो-फ्रेंच सेनेला नार्विक सोडून फ्रान्सकडे परतावे लागले.

फ्रान्सला युद्धोन्मुख करायचे असेल तर सर्वोच्च लष्करी नेतृत्वामध्ये बदल करायला हवा हे रेनॉ याला प्रारंभापासून वाटत होते. अनेकांजवळ तो हा विचार बोलून दाखवीत होता. सत्तावीस एप्रिलला संयुक्त युद्ध समितीच्या बैठकीला हजर राहण्यासाठी लंडनला निघण्यापूर्वी तो बोर्दो याला म्हणाला होता–"गामेलिनऐवजी वेगान्दकडे सरसेनानीपद सोपवावं असं मला सारखं वाटतंय. परंतु तसं करायला दलादिएचा तीव्र विरोध आहे. म्हणून मी असं ठरविलं आहे की लंडनहून परतताच संरक्षणमंत्रिपद दलादिएकडून काढून घ्यायचं आणि स्वतःकडे ठेवायचं."

लंडनला असतानाच रेनॉला फ्ल्यूने गाठले आणि त्यामुळे गामेलिनबाबतचा आपला विचार त्याला पुढे ढकलावा लागला. आठवडाभर संपूर्ण विश्रांती घेण्याचा डॉक्टरांनी रेनॉला सल्ला दिला होता.

रेनॉची प्रेयसी कासंटेस हेलेन द पोर्ते हिची अशी समजूत होती की राजकारण आपल्याला चांगले समजते. त्यामुळे अनेक राजकारणी नेत्यांचे तिच्याकडे येणेजाणे होते. रेनॉने राज्यकारभाराच्या बाबतीत देखील आपले ऐकले पाहिजे असा तिचा हट्ट होता. अशा या महत्त्वाकांक्षी स्त्रीला रेनॉच्या आजारपणामुळे आपले वर्चस्व गाजविण्याची चांगलीच संधी मिळाली. मंत्रिमंडळाच्या आणि युद्ध समितीच्या बैठकींचे अध्यक्षपद ती प्रधानमंत्र्याच्या खुर्चीवर बसून भूषवू लागली. रेनॉ आपल्या खोलीत झोपलेला असायचा आणि बाहेरच्या खोलीत हेलेन मंत्र्यांना, सेनानींना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना फ्रान्सने आता कोणते धोरण आखले पाहिजे यासंबंधी प्रवचने देई. या चर्चेला बैठकी म्हणण्याऐवजी प्रवचने म्हणणेच अधिक योग्य होते. कारण हेलन एकटीच बोलत असायची आणि बोलण्याचा थाट घरमालकिणीने मोलकरणीशी बोलावे तसा होता.

एकदा 'पारी स्वार' या दैनिकाचा संपादक पिएर लाझारेफ याने प्रधानमंत्र्याच्या निवासस्थानी टेलिफोन केला. हेलेनने रिसिव्हर उचलला. लाझारेफ म्हणाला,

"प्रधानमंत्र्याशी काही महत्त्वाच्या कामाबाबत मला बोलायचं आहे. केव्हा येऊ?"

हेलेन म्हणाली, "सध्या आमच्यापुढे कामाचे डोंगर पडलेले आहेत. तरी देखील येऊन जा."

रेनॉंच्या कचेरीतील दृश्य पाहून लाझारेफला कमालीचे आश्चर्य वाटले. प्रधानमंत्र्याच्या प्रेयसीने थाटात वावरावे हा प्रकार अजब होता. रेनॉंच्या खुर्चीवर बसलेली हेलेन अधूनमधून फायलींवर नजर टाकीत होती आणि अधूनमधून समोर उभ्या असलेल्या अधिकाऱ्याला, आज कोणते काम करायचे यासंबंधी हुकूम सोडीत होती. पाच दहा मिनिटे झाली की ती खुर्चीवरून उठे आणि रेनॉंच्या खोलीचे दार किलकिले करून बाहेर उभ्या असलेल्या लोकांना ऐकू जाईल इतक्या मोठ्याने रेनॉला विचारी, "पॉल कशी काय तब्येत आहे आता? बरं वाटतंय ना? स्वस्थ पडून रहा. तुला विश्रांतीची खूप गरज आहे. राज्यकारभाराची काळजी करू नकोस. आम्ही सारं नीट पहात आहोत."

हेलेनसमोर उभे असलेले सरकारी अधिकारी निघून गेल्यावर लाझारेफने विचारले, "मला दोन मिनिटं रेनॉं यांना भेटायचंय."

हेलेन उत्तरली, "नाही, ते शक्य नाही. पॉल आजारी आहे. तुम्हाला काही सांगायचं असेल तर ते मला सांगा."

"प्रधानमंत्री बरे झाले म्हणजे मी येईन," असे बोलून लाझारेफ तेथून बाहेर पडला.

आठवडाभराच्या विश्रांतीनंतर रेनॉंची प्रकृती सुधारली. मध्यंतरीच्या काळात रणगाडा दलाचा नवा प्रमुख द गॉल याचे पत्र त्याला आले होते. द गॉलने त्या पत्रात म्हटले होते – "रणगाड्यांचं महत्त्व जाणणारं नेतृत्त्व फ्रेंच सरकारला उपलब्ध झालं नाही तर या युद्धात आपला टिकाव लागणं सर्वस्वी अशक्य आहे. प्रधानमंत्री या नात्यानं आपण या प्रश्नाचा विचार करावा अशी माझी विनंती आहे!"

हे पत्र मिळताच, गामेलिनला सरसेनानीपदावरून दूर करण्याचा रेनॉं याचा मूळचा निश्चय दृढ झाला. नऊ मे रोजी सकाळी रेनॉं याने राष्ट्राध्यक्ष लेब्रनची भेट घेऊन त्याला आपला निर्णय कळविला. गामेलिन याला बडतर्फ करताच संरक्षणमंत्री दलादिए राजीनामा देणार हे उघड असल्यामुळे सध्याच्या बिकट परिस्थितीत रेनॉं याने मंत्रिमंडळामध्ये पेचप्रसंग निर्माण करू नये असा लेब्रनने सल्ला दिला. परंतु आता गामेलिनबाबतच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची रेनॉंची तयारी नव्हती. लेब्रनची भेट घेऊन 'के दोर्से' मध्ये परतताच त्याने मंत्रिमंडळाची बैठक बोलविली.

या बैठकीत रेनॉंने सांगितले, "नार्वेमधील जर्मन आक्रमणाला रोखण्यासाठी गामेलिननं काही केलं नाही. त्यामुळे त्यापुढेही तो सरसेनानीपदावर राहिला तर नक्कीच आपला पराभव होईल. म्हणून गामेलिनला बडतर्फ करायचं असं मी ठरविलं आहे."

यानंतर अपेक्षेप्रमाणे दलादिए बोलायला उभा राहिला. तो म्हणाला, "नार्वेमधल्या फटफजितीला ब्रिटन जबाबदार आहे. शिवाय जर्मनीशी शक्य तितकं मिळतं घ्यायचं असंच आपलं धोरण आहे. म्हणून सगळ्या दोषांचं खापर एकट्या गामेलिनच्या माथी मारायला माझा सक्त विरोध आहे."

दलादिएच्या भाषणानंतर इतर मंत्र्यांनी बोलावें अशी रेनॉं याची अपेक्षा होती. परंतु कोणीच बोलेना. त्यामुळे रेनॉं म्हणाला, "असं असेल तर मला मंत्रिमंडळाची पुनर्घटना करायला हवी. त्यासाठी हे मंत्रिमंडळ बरखास्त झालं पाहिजे. म्हणून मी राष्ट्राध्यक्षांकडे प्रधानमंत्रिपदाचं त्यागपत्र धाडून देणार आहे."

मंत्रिमडळाच्या बैठकीत रेनॉं याने आपल्यावर कठोर टीका करावी याचा गामेलिनला राग आला आणि त्यामुळे त्याने पुन्हा आपला राजीनामा लिहून काढला.

पॅरिसमध्ये फ्रेंच मंत्रिमंडळाची बैठक सुरू असतानाच, बर्लिनमधल्या हिटलरच्या कचेरीत जर्मन सेनानी गोळा झालेले होते. हिटलर त्यांना सांगत होता – "पश्चिम आघाडी उघडण्याचा मुहूर्त गेल्या बारा नोव्हेंबरपासून सारखा पुढे ढकलला जात होता. आता थांबायचं कारण नाही. फ्रान्सचा पाडाव केल्याशिवाय या युद्धाची समाप्ती करायची नाही असा माझा निर्धार आहे! १९१८ मध्ये फ्रान्सने ज्या ठिकाणी आपल्या सेनानींकडून शरणागतीच्या कागदावर सही घेतली त्याच ठिकाणी पुन्हा एकदा आपल्याला जमायचं आहे. फरक एवढाच राहील की जर्मन सेनानी शरणागतीचा कागद पुढे करतील आणि फ्रान्सला त्यावर सही करावी लागेल. तुमच्या 'फ्युरर'ची ही महत्त्वाकांक्षा साकार करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. म्हणून माझा तुम्हाला आदेश आहे – उद्या दहा मे रोजी सकाळी साडे पाच वाजता आपली सेना बेल्जममध्ये घुसली पाहिजे. बेल्जमपासून फ्रान्स काही दूर नाही."

हिटलरच्या आदेशाप्रमाणे पायदळाच्या एकशेसव्वीस डिव्हिजन्स आणि रणगाड्यांच्या दहा डिव्हिजन्स ठरल्या क्षणाला पश्चिमेकडे कूच करू लागल्या.

– आणि यावेळी फ्रान्समध्ये सरकारही अस्तित्वात नव्हते आणि सरसेनानीचाही पत्ता नव्हता.

बिकट कालखंडामध्ये सरकार अस्तित्वात नसण्याची तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या इतिहासातील ही काही पहिलीच वेळ नव्हती. पूर्वी दोनदा असे घडले होते.

पण यावेळची परिस्थिती वेगळी होती. फार वेगळी होती. जबरदस्त सामर्थ्यानिशी एक मदांध शत्रू फ्रान्सवर झेपावत होता.

(क्रमशः)



# मुद्रण व्यवस्थापन मंत्र आणि तंत्र

य. गो. जोशी

व्यवस्थापन (Management) क्षेत्रात पाश्चात्य देशांनी फार मोठी वाटचाल केली आहे. दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेली जर्मनी आणि जपान ही दोन राष्ट्रे व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर उठून उभी राहिली. एवढेच नव्हे तर गेल्या पंचवीस वर्षात या राष्ट्रांनी औद्योगिक क्षेत्रात विस्मयजनक प्रगती केलेली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर उत्पादनाचे स्वरूप झपाट्याने पालटत चालले आहे. एखादी वस्तू तयार करायची आणि आपणच बाजारात जाऊन ती विकायची हे धंद्याचे तंत्र नव्या युगात मागे पडले आहे. छोट्या उत्पादकांच्या बरोबरच मोठे कारखाने जागोजाग उभे रहात आहेत. उत्पादनाचे स्वरूप आता विशाल झाले आहे. छोट्या धंद्यात मिळणारा निर्मितीचा आनंद लुप्त होत चालला आहे. आणि प्रचंड प्रमाणात मोठे कारखाने चालविणाऱ्या मंडळींनी व्यवस्थापनाची सूत्रं हाती घेतली आहेत. उत्पादन करणारा 'घटक' (worker) आणि उत्पादनाची विशाल आणि भव्य यंत्रणा काबूत ठेवणारा व्यवस्थापक यांच्यामध्ये फार मोठी दरी निर्माण झाली आहे. ही दरी सांधणारा पूल म्हणजेच व्यवस्थापनाचे 'तंत्र आणि मंत्र.' पाश्चात्य राष्ट्रातसुद्धा हा पूल अपुरा पडत आहे. कारण कारखान्यात काम करणारा घटक हा यंत्राचा एक अविभाज्य भाग बनला आहे. भारतातील अनेक मोठ्या कारखानदारांचे लक्ष आता व्यवस्थापनाच्या तंत्र आणि मंत्राकडे आकर्षित झाले आहे. प्रदीर्घ अनुभवातून व संशोधनातून व्यवस्थापनाचे शास्त्र निर्माण होत आहे. पाश्चात्य राष्ट्रात गेल्या पंचवीस-तीस वर्षात या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले

गेले व जात आहेत. उत्पादनांचा राक्षस काबूत ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर येऊन पडली आहे. अशावेळी निरनिराळचा व्यवसाय करणाऱ्या व्यवस्थापकांनी या विषयाचा सखोल अभ्यास करणे आता अत्यंत आवश्यक झाले आहे.

भारतातील परिस्थिती व तात्त्विक बैठक लक्षात घेऊन व अनेक पाश्चात्य पुस्तकांचा अभ्यास करून श्री. यशवंत गो. जोशी यांनी 'मुद्रण व्यवस्थापन' हा ग्रंथ लिहिला आहे. परकीयांचे अनुकरण करायचे हा दृष्टीकोन न ठेवता जे चांगले असेल ते घ्यावयाचे हे मनात ठेऊन पंचवीस वर्षांच्या तपश्चर्येच्या जोडीला श्री. जोशी यांनी ह्या विषयावरील व त्याला अनुसरून पाश्चात्य ग्रंथाचा कसून अभ्यास केला. व्यवस्थापन हे शास्त्र आहे की कला आहे या वादात न पडता ती एक मन:प्रवृत्ती आहे हे त्यांनी सांगून टाकले आहे. गेल्या पंचवीस तीस वर्षात जी औद्योगिक क्रांती होत आहे व ज्या औद्योगिक क्रांतीतून मोठमोठे कारखाने उभे रहात आहेत त्यांच्या अनुभवातून व्यवस्थापनाचे शास्त्र निर्माण होत आहे. हे शास्त्र कसे वापरावयाचे ती एक कला आहे. मात्र शास्त्र वापरण्याची कला जर आत्मसात झाली नाही तर शास्त्राचे शस्त्र होण्याचीही शक्यता असते.

श्री. जोशी यांनी या विषयाचे दोन भाग पाडले आहेत. पहिल्या नऊ प्रकरणात मुद्रणव्यवसायाचा मंत्र व पुढील नऊ प्रकरणात तंत्र सांगितले आहे. या दोन्ही अगाचं विवेचन करताना श्री. जोशी यांचा सखोल अभ्यास आणि प्रदीर्घ अनुभव जागोजाग प्रत्ययाला येतो. कोणतेही विधान करताना त्यांनी दैनंदिन व्यवहार करताना येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणी, टाचणे व दाखले दिले आहेत. पाचव्या प्रकरणात त्यांनी सांगितलेली 'अधिकार प्रदानाचो पथ्ये'–फारच महत्त्वाची वाटतात. व्यवस्थापनाची सूत्रे ज्यांच्या हातात आहेत त्यांनी ही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे चौदाव्या प्रकरणातील 'मूल्यमापन शास्त्र' आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. नवव्या प्रकरणातील उदाहरणे देऊन सिद्ध केलेला उत्पादनक्षमते संबंधीचा मूलभूत विचार खोलवर रुजणारा आणि मार्गदर्शक आहे.

भारताने व्यवस्थापनेच्या क्षेत्रात आणि शास्त्रात फारशी प्रगती अद्याप केलेली नाही. मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेला व्यवसाय शास्त्रशुद्ध पद्धतीने व कौशल्याने चालवायचा म्हणजे तो चालविणाऱ्या व्यवस्थापकांच्या मनोवृत्तीची वाटचाल हाती घेतलेल्या धंद्याचे शास्त्र आणि कला यांचा समन्वय घालण्याच्या दिशेनं व्हायला हवी. हे मुद्रणव्यवसायाचं व्रत ज्यांनी अंगिकारलं आहे अशा मंडळींना श्री. जोशी यांचा ग्रंथ निश्चित मार्गदर्शन करील. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांना सुद्धा हा ग्रंथ उद्बोधक आणि मनोरंजक वाटेल याबद्दल मला शंका नाही.

**— रंगा मराठे**

ले. य. गो. जोशी, प्रकाशक : सु. य. जोशी, पूर्णिमा प्रकाशन, पुणे - मूल्य : १० रु.

**दत्तप्रसाद दाभोळकर**

# लक्ष्मणरेषेच्या पलीकडे ...

कितीं मजेशीर ! –मर्यादेचे अतिक्रमण होऊ नये म्हणून लक्ष्मणरेषा ओढली जाते. आणि या लक्ष्मणरेषेलाही शेवटी एक मर्यादा असते.

लक्ष्मणरेषेच्या अलीकडे सीता सुरक्षित होती. लक्ष्मणरेषेच्या पलीकडे रावणही सुरक्षित होता–शंकराचार्य–मंडनमिश्र यांच्या वादाची आठवण व्हावी असे वाद विज्ञानातही खेळले जातात. शब्दांचे कीस काढत आणि अर्थातील अनर्थ दाखवित विज्ञानातही नवे विचार पुढे येत असतात.

–आइन्स्टाइन एवढेच म्हणाला होता की, प्रकाशाचा वेग ही लक्ष्मणरेषा आहे. हा वेग ज्यावेळी ओलांडला जाईल त्यावेळी एखाद्या वस्तूचे अस्तित्वच नाहीसे होईल. खरे बोलायचे तर प्रकाशाचा वेग कोणालाही कधीच गाठता येणार नाही. या एवढ्या विधानावरून प्रकाशाच्या वेगाहून अधिक प्रवास करणारे काही अस्तित्वातच असणार नाही असे आपण मानत होतो. पण गेल्या काही वर्षात काही नवे संशोधन पुढे आले आहे. आइन्स्टाइनच्याच शब्दांचा आधार घेऊन डॉ. सुदर्शन यांच्यासारखे शास्त्रज्ञ प्रकाशाच्या वेगाहून अनेक पट वेगाने प्रवास करू शकणाऱ्या गोष्टी या विश्वात अस्तित्वात असतील म्हणून ठामपणे सांगू लागले आहेत. प्रकाशाच्या वेगाहून अनेक पट वेगाने प्रवास करणाऱ्या या कणांना (Particles) टेकयॉनस (Techyons) असे म्हणतात. या टेकयॉन कणांचा मूळचाच वेग प्रकाशाच्या वेगाच्या अनेक पट असतो. हा वेग कमी कमी झाला तरीही तो प्रकाशाच्या वेगाएवढा कमी होऊ शकत नाही. –म्हणजे डॉ. सुदर्शन यांच्या भाषेत, कोणतीही वस्तु प्रकाशाचा वेग गाठू शकणार नाही या आइन्स्टाइनच्या विधानाला टेकयॉनच्या अस्तित्वाने कोणताही धक्का पोचत नाही ! प्रकाशाचा वेग ही लक्ष्मणरेषा मानली, तर आपल्याला ज्ञात असलेले जग लक्ष्मणरेषेच्या अलीकडे असते. टेकयॉनस् लक्ष्मणरेषेच्या पलीकडे सुरक्षित असतात. या टेकयॉनना एक विलक्षण वर मिळालेला असतो. यांचा वेग जसजसा वाढतो तसतसा त्यांच्या शक्तीचा ऱ्हास होऊ लागतो. त्यांचा वेग ज्या प्रमाणात कमी होऊ लागतो त्या प्रमाणात त्यांची शक्ती वाढू लागते. आपल्याला ज्ञात असलेल्या, प्रकाशाच्या वेगाहून कमी गतीने प्रवास करणाऱ्या, म्हणजेच लक्ष्मण-

रेषेच्या अलीकडे असलेल्या वस्तूंची स्थिती नेमकी याच्या उलट असते. त्यांचा वेग जसा कमी होतो त्याप्रमाणात त्यांच्या शक्तीचाही -हास होत असतो.

टेकयॉनचा वेग ज्यावेळी अमर्याद अनंत होतो त्यावेळी त्यांची शक्ती शून्य होते. जेव्हा त्यांची शक्ती वाढत वाढत अमर्याद किंवा अनंताच्या जवळ जाऊ लागते त्यावेळी त्यांचा वेग कमी कमी होत प्रकाशाच्या वेगाच्या जवळपास पोचलेला असतो. –ही शास्त्रीय भाषा समजली नाही तरीही या टेकयॉनची एक मजेशीर गोष्ट तुमच्या लक्षात आलेली असेल. –ते येण्यापूर्वीच गेलेले असतात. किंवा आपण ज्या काळाला मानतो, त्या काळाला धरून ते मागे मागे जात असतील. म्हणजे, विनोदी भाषेत शास्त्रीय सत्य सांगावयाचे तर, टेकयॉनच्या गतीने एखादा माणूस आज आपल्या सूर्यमालेच्या प्रदक्षिणेला निघाला तर काल तो प्रदक्षिणा संपवून परत आलेला असेल!

टेकयॉन ही अजून तरी काही फार मोठ्या शास्त्रज्ञांच्या कल्पनेपुरती मर्यादित असलेलीच गोष्ट आहे. पण जोपर्यंत तुम्ही टेकयॉन अस्तित्वात नाहीत हे सिद्ध करू शकत नाही तोपर्यंत ते अस्तित्वात असण्याची शक्यता आहे हे तुम्हाला मान्य करावेच लागेल! अमेरिकेतील काही नामवंत शास्त्रज्ञ आज प्रयोगशाळेत टेकयॉनची निर्मिती करून त्यांचे अस्तित्व जाणवून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. असा एक महत्त्वाचा प्रयोग अल्वागर आणि क्रिसलेर या दोन शास्त्रज्ञांनी नुकताच केला.

अल्वागर आणि क्रिसलेर यांचा हा प्रयोग अर्थातच टेकयॉनचे अस्तित्व सिद्ध करू शकला नाही. पण म्हणून, टेकयॉनवेडे शास्त्रज्ञ निराश झालेले नाहीत. काही शास्त्रज्ञांच्यामते टेकयॉनच्या निर्मितीसाठी, अमर्याद, अनंत दाबाची (Pressure) जरूरी असते. असा दाब पृथ्वीपासून अनेक कोटी प्रकाश वर्ष अंतरावर असलेल्या

---

## विशाल भारत

ऑस्ट्रेलियातील कॅनबेरा विद्यापिठातील डॉ. क्रॉफर्ड हे भूगर्भशास्त्रातील एक दादा इसम समजले जातात. नेचर या मासिकात त्यांनी नुकताच एक लेख लिहिला आहे. गेली काही वर्षे भारत, सिलोन व ऑस्ट्रेलिया यांच्यातील प्राचीन दगडांवर ते अभ्यास करीत होते. चाळीस कोटी वर्षांपूर्वीच्या या देशातील अनेक दगडांचा त्यांनी अभ्यास केला आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या सीमाभागात सापडणाऱ्या दगडांच्या वयाचा व गुणधर्माचा अभ्यास करताना त्यांना एक गोष्ट आढळून आली. या दगडांच्यात जुळ्या भावाइतके साम्य आहे. किंबहुना हे जुळे भाऊच आहेत.–डॉ. क्रॉफर्ड यांच्या मते कोट्यावधी वर्षापूर्वी भारत आणि ऑस्ट्रेलिया हा निःसंशयपणे एकसंध भूभाग होता.

' क्वासर्स ' (Quasars) मध्ये अस्तित्वात आहे. त्या ठिकाणीच टेकयॉनची निर्मिती होऊ शकेल. अर्थातच टेकयॉन अस्तित्वात आहेत आणि आपण ते निर्माण करू शकू असे जर आपण गृहीत धरले तर त्यापासून कोणते फायदे होतील ? –टेकयॉनच्या गतीने अंतरीक्षयानाने प्रवास केला तर फार थोडया काळात ते इतर सूर्यमालात जाऊन पोचेल हे खरे. –पण पृथ्वीवरच्या लक्ष्मणरेषेच्या अलीकडील कोणत्याही कणांना टेकयॉनचा वेग घेता येणार नाही हे आपण यापूर्वीच पाहिलेले आहे. म्हणूनच टेकयॉन अस्तित्वात आले तरी अंतरीक्षयानांना त्याचा वेग घेता येणार नाही. पण संदेश वाहन करण्यासाठी आपण ज्याप्रमाणे पृथ्वीवर संवह तरंग (Radio waves. Electro magnetic waves) वापरतो. त्याचप्रमाणे दूरच्या सूर्यमालेवर संदेश पाठवण्यासाठी आपण टेकयॉन वापरू शकू. –टेकयॉन जर अस्तित्वात असतील तर पुणे मुंबई फोनला लागतो त्यापेक्षा कमी वेळ लाखो प्रकाशवर्ष अंतरावरील, ग्रहावर राहणाऱ्या माणसाशी फोनवरून बोलावयास लागेल !

## अधुनिक सत्यवान....

माणूस चंद्रावर जाऊन परत आलाय. लवकरच माणूस मंगळावरही जाणार आहे. पण परवा एका माणसाने कमाल केली. तो चक्क स्वर्गात जाऊन परत आला ! हा असला अक्षरशः ' जगावेगळा ' प्रवास करणाऱ्या या अधुनिक सत्यवानाचे नाव आहे जे स्निडर. डॉ. मार्क रॅव्हीश यांनी या सत्यवानाची कथा नुकतीच प्रसिद्ध केली आहे. सायकलवरून जाताना जे स्निडरवर आकाशातून वीज कोसळली. त्यानंतर ४५ मिनिटांनी काही बालवीरांनी त्याला डॉक्टरकडे नेले. डॉक्टरकडे नेण्यापूर्वीच स्निडरची प्राणज्योत लौकिक दृष्टया मालवलेली होती. त्याच्या हृदयाचे स्पंदन आणि छातीचे ठोके थांबलेले होते. त्याचे ओठ नीळे-काळे पडू लागले होते. त्याचे डोळे बुबुळे फिरलेली होती. चिकॅगो विद्यापीठातील वैद्यक शास्त्राचे प्राध्यापक डॉ. रॅव्हीश त्यावेळी तेथे होते. त्यांनी त्याची छाती शस्त्रक्रियेने उघडून त्याच्या हृदयाला यांत्रिक मालीश केले. पाच मिनिटात त्याचे हृदय पूर्ववत सुरू झाले. त्यानंतर सहा दिवस स्निडर बेशुद्धावस्थेत होते. त्यानंतर पूर्ववत बरे होऊन रुग्णालयाबाहेर जाण्यास स्निडरना २९ दिवस लागले. आज अनेक महिन्यानंतर त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. बोलण्यात आलेला थोडा दोष सोडला तर त्या वज्राघाताची कोणतीही निशाणी त्यांच्या शरीरावर उरलेली नाही.

डॉ. रॅव्हीश यांच्या मते, स्निडर वाचले याला प्रामुख्याने बालवीर जबाबदार आहेत. दवाखान्यात आणण्यापूर्वी बालवीरांनी तत्परतेने स्निडर यांच्या छातीला मालीश केले होते. त्यांच्या हृदयात सुप्त प्रमाणात धुगधुगी ओतली होती. हृदया-

वर अगदी प्रथम झालेल्या या मालीशामुळेच स्निडर यांचे हृदय नंतर काम करू लागले. हृदय बदलण्याच्या शस्त्रक्रियांमुळे हृदय थांबवून ते पुन्हा सुरू करता येते हे आपणाला समजलेले आहेच. जे स्निडर यांच्या उदाहरणामुळे आपण आणखी एक पाऊल पुढे गेलो आहोत. डॉ. हेलन टॅंग या प्रख्यात डॉक्टरच्या घराजवळचा एक लहान मुलगा नुकताच वीज कोसळून मरण पावला. त्यानंतर त्याच्या शोक-सभेत बोलताना डॉ. टॅंग म्हणाले, खरे पाहता स्निडरप्रमाणेच आपण या लहान मुलालाही वाचवू शकलो असतो. विज्ञानातील नवे प्रयोग व नवी माहिती झपाट्याने पसरवण्यात आपण असमर्थ ठरलो त्यामुळे हा मुलगा मरण पावला.

डॉ. रॅव्हीश आणि डॉ. टॅंग या दोघांनी मिळून आता आपले अनुभव प्रसिद्ध केले अहेत. त्यांच्या मते वीजेचा धक्का लागून मरण पावलेला माणूस आणि आकाशातून वीज कोसळून मरण पावलेला माणूस यात शास्त्रीय दृष्ट्या फरक

---

## पाणी आणि जीवन...

वरवर साध्या वाटणाऱ्या गोष्टी आपल्या आयुष्यावर फार मोठा परिणाम घडवून जात असतात. ' न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन ' या मासिकात प्रसिद्ध झालेली ही उद्‌बोधक माहिती पहा. ऑन्टारिओ या प्रांतात मरण पावलेल्या पंचावन्न हजार रोग्यांच्या वापरात आलेल्या पिण्याच्या पाण्यावर एका संस्थेने संशोधन केले. प्यावयाच्या पाण्याची त्यांनी कठीण, मध्यम प्रतीचे कठीण व मृदू पाणी अशा तीन वर्गात विभागणी केली. पाण्यात विरघळलेल्या रासायनिक पदार्थांच्या प्रमाणावर ही प्रतवारी करण्यात आली होती. हे पाणी पिणाऱ्या लोकसंख्येतील, दर लाख लोक-वस्तीला दरवर्षी असलेले मृत्युचे प्रमाण, कठीण पाणी ३६५ लोक, मध्यम प्रतीचे कठीण पाणी ३१० लोक, आणि मृद् पाणी ४१६ लोक पडते असे त्यांना आढळून आले. त्यातुनही मृदू पाणी पिणाऱ्या लोकांपैकी अनेक लोक हृदयाच्या विकाराने मरण पावले होते. या लोकवस्तीतील लोकात, इतर अनेक बाबतीत एवढे साम्य होते की सरासरीच्या नियमाप्रमाणे मृत्यूसंख्येत व आजारात पडणारा फरक हा पाण्यातील फरकामुळे पडणारा फरक असे या संस्थेचे म्हणणे आहे. अर्थात कठीण पाण्यात अस्तित्वात असलेला वा मृदू पाण्यात अस्तित्वात नसलेला एखादा पदार्थच या गोष्टीला कारणीभूत ठरतो हे अद्याप निर्विवादपणे सिद्ध झालेले नाही. काही शास्त्रज्ञांच्या मते मृदू पाणी थोडे अधिक आम्लधर्मी (Acedic) असते. त्यामुळे पाण्याच्या नळांना आतून लावलेला अत्यल्प प्रमाणातील कॅडमियम हा धातू या पाण्यात विरघळला जातो व या विरघळलेल्या कॅडमियममुळे मृत्यूसंख्येत वाढ होते.

---

आहे. आकाशातून वीज कोसळते त्यावेळी धक्का बसून माणसाचे हृदय सर्वप्रथम बंद पडते. अशा प्रकारे बंद पडलेले हृदय अगदी लगेच प्रयत्न केले तर चालू होऊ शकते. किंबहूना हृदयविकाराने आजारी असलेले रोगी बरे करण्यासाठी आपण यापूर्वीच ही पद्धत वापरलेली आहे. उदाहरणार्थ प्रेसिडेंट आयसनहॉवरना हृदयाचा शेवटचा झटका आला त्यावेळी त्यांच्या हृदयाचा ताल चुकू लागला होता. हा ताल सुधारण्यासाठी डॉक्टरांनी त्यांना एक वेगळ्या प्रकारचा विजेचा धक्का दिला. हा धक्का आकाशातून कोसळणाऱ्या विजेच्या धक्याशी मिळताजुळता होता. त्यामुळे त्यांचे अनियमितपणे चालणारे हृदय संपूर्णपणे बंद पडले. त्यानंतर त्याला यांत्रिक मालीश करून ते नियमितपणे सुरू करण्यात आले. थोडक्यात आकाशातून वीज कोसळून मरण पावलेल्या लोकांपैकी अनेक लोक आपण योग्य प्रयत्नांने सहज वाचवू शकू.

तुम्ही रस्त्यातून जाताना मुसळधार पाऊस, वादळ व वीज चमकणे सुरू झाले तर त्यांची अवहेलना करू नका. त्यांचा योग्य तो आदर राखा. अशावेळी झाडाखाली उभे राहू नये. कोणतीही तारेची वस्तू-अगदी छत्रीसुद्धा-हातात धरू नये या परंपरागत कल्पना बरोबर आहेत. समजा, तुमच्या सभोवती दोन तीन माणसे विजेचा धक्का लागून पडलेली आहेत. अशावेळी त्यातील अत्यवस्थ पण जिवंत असलेल्या माणसापेक्षा रुढार्थाने मरून पडलेल्या माणसाला तुमच्या मदतीची सर्वात अधिक जरूरी आहे हे विसरू नका. अत्यवस्थ असलेल्या माणसावर प्रथमोपचार करण्यात वा त्याला धीर देण्यापेक्षा रुढार्थाने मरण पावलेल्या माणसाच्या छातीचे मालीश व कृत्रिम श्वसोच्छवास या गोष्टी सत्वर सुरू करा. पाण्यात बुडालेल्या माणसासाठी मालीश व कृत्रिम श्वासोच्छ्वास यांच्या ज्या पद्धती तुम्ही वापरता त्याच पद्धती यावेळी तुम्हाला वापराव्या लागतील. हे सारे करत असतानाच त्या माणसाला त्वरेने तुम्हाला जवळच्या सुसज्ज रुग्णालयात न्यावे लागेल.-डॉ. रॅव्हीश आणि डॉ. टॅग यांच्या मते अगदी अप्रगत देशात सुद्धा या गोष्टी शक्य आहेत. मानवी जीवनाला तुम्ही किती किंमत देता हा खरा प्रश्न आहे.-मानवी जीवनाबद्दल तुमच्या मनात आदर असेल, तर वीज कोसळून मरण पावणाऱ्या जगातल्या सहस्त्रावधी लोकांना तुम्ही नजीकच्या भविष्यकाळात वाचवू शकाल. हे सत्यवान सहज वाचू शकतील. त्यासाठी विज्ञान आज तुमच्या मदतीला तयार आहे. मात्र जरूरी आहे सावित्रीने केलेल्या प्रयत्नांची, उपासनेची आणि निष्ठेची.

□ □ □

## रंगभूमी

# देव दीनाघरी धावला

बाळ कोल्हटकर यांची आत्तापर्यंतची नाटके एका विशिष्ट पद्धतीची आहेत. सामाजिक, कौटुंबिक भावनांशी खेळ- णाऱ्या–मेलो ड्रॅमॅटिक पद्धतीच्या त्यांच्या 'Typed' नाटकांना प्रेक्षकांचा चांगला आश्रय मिळतो. 'देव दीनाघरी धावला' या आपल्या नवीन नाटकामध्ये कोल्हट- करांनी सामाजिक नाटकाची चौकट सोडली असली, तरी कृष्ण-सुदामा मैत्रीचे कथानक सांगणाऱ्या या नाटकाला सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

देव दीनाघरी धावला या नाटकाचे कथानक, कथा या दृष्टीने प्रेक्षकांना परिचित. कृष्ण सुदाम्याची सत्त्व-परीक्षा पाहतो. आणि अखेरीस या निर्लोभी ब्राह्मणाची नगरी सुवर्णनगरी करतो. सत्यभामा–रुक्मिणी यांचा संघर्ष हा खास कौटुंबिक पातळीवरचा भाग कोल्हटकर यांनी त्यांच्या नेहमीच्या ढंगाने हाताळला आहे. सत्यभामा–म्हणजे लोभ, आणि रुक्मिणी म्हणजे त्याग अशी प्रतीके उभी करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला आहे.

कोल्हटकरांजवळ भाषासामर्थ्य आहे. संवादलेखनाचे कौशल्य आहे. प्रेक्षकांना काय रुचते हे जाणून नाटकाची मांडणी करण्याचे कसब आहे. त्यामुळे प्रेक्षक

शरद गोखले

त्यांच्या नाटकांवर खूष असतात. प्रेक्षकांची नाडी अचूक हेरणाऱ्या बाळ कोल्हटकरांचे हे नवीन नाटक मांडणीच्या बाबतीत समाधान देत नाही. विशेषत: दुसरा अंक–कथाप्रवाहाची गती मंदावल्याने, कंटाळवाणा होतो. त्या मानाने पहिला अंक पुष्कळच सरस वाटतो. तिसऱ्या अंकावर तर त्यांच्या खास 'कौटुंबिक' लिखाणाचे जबरदस्त सावट पडले आहे.

विषय निवडल्यावर त्याच्या मांडणीसंबंधी कोल्हटकर गोंधळलेले असावेत. कृष्ण-सुदामाची कथा, रुक्मिणी-सत्यभामा संघर्ष, संपन्नतेमुळे कलह माजून सुरू झालेली यादवी–आणि या सर्वांची सांगड घालताना सद्य: परिस्थितीवर भाष्य करण्याचा होणारा मोह, नारदाला दिले गेलेले अवास्तव महत्त्व, यामुळे नाटकाला जो एक सुसंगतपणा लागतो तो येथे लाभत नाही. नाट्यलेखनामागे केवळ मनोरंजन हा हेतू नाही. पण मग नाटककाराच्या मनात जे आहे, ते नाटकाच्या कुशल मांडणीतून स्पष्ट व्हायला नको का ? पण तसे होत नाही. त्यामुळे लेखनाच्या दृष्टीने प्रयोग-यशावर जो परिणाम व्हायला पाहिजे, तो होत नाही. मांडणीतील अपयशाची कसर कोल्हटकर संवादलेखनात भरून काढतात.

दुर्वांच्या जुडीपासून त्यांनी सुरू केलेली सुभाषित-पद्धती याही नाटकात पाहायला सापडते. या सुभाषितांचा अर्थ बरोबर कळेल अशा पद्धतीने ती प्रेक्षकांपर्यंत पोचवली जातात–आणि प्रेक्षक त्याची पावतीही देतात. संपन्नता आणि दारिद्र्य यांना एकमेकांसमोर उभे करून त्यांच्यामध्ये घडवलेली जुगलबंदी प्रेक्षकांना पसंत पडते. संवादलेखनाची ही मजबूत बाजू हाच कोल्हटकरांच्या नाटकांच्या व्यावसायिक यशाचा महत्त्वाचा आधार असतो. तसाच तो येथेही आहे. संवादातून प्रेक्षकांशी सुसंवादित्व निर्माण करण्याचे कोल्हटकरांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

नाट्यमांडणीच्या दृष्टीने ठिसूळ असणारे हे नाटक दुर्वांची जुडी या आपल्या संस्थेमार्फत कोल्हटकरांनी मोठ्या थाटामाटात रंगभूमीवर आणले आहे. रघुवीर तळाशीलकर यांचे नेपथ्य नाटकाची गरज पूर्ण करणारे, प्रयोगाची रंगत वाढवणारे, आणि त्याचा एकंदर आब पहाता तुलनेने फारशी तांत्रिक गुंतागुंत नसलेले आहे. प्रकाशयोजनेचा उपयोग ठीक असला, तरी सर्व कलावंतांना प्रकाशतंत्राचे ज्ञान नसल्याने, रंगमंचावरील हालचाली अचूक झाल्या नाहीत तर तंत्र चांगले असले तरी ते यशस्वी होऊ शकत नाही, याचा प्रत्यय आला. वसंतराव देसाई यांनी पार्श्वसंगीत मोठे झकास दिले आहे. विश्वनाथ बागूल आणि कुमार गंधर्व यांची गाणी वातावरणनिर्मिती करतात. विशेषत: कुमारांची भूपाळी उत्कृष्ट वाटते. सर्वसाधारण पौराणिक नाटकात आढळणार नाही इतकी दक्षता वेषभूषेच्या बाबतीत घेतली आहे.

कलाकारांपैकी सर्वांत प्रभावी–जोगळेकर यांचा सुदामा. आशा काळे यांची रुक्मिणीही चांगली वाटते. बाळ कोल्हटकर नारदाची भूमिका करतात. लेखन

त्यांचे, दिग्दर्शन त्यांचे, कंपनीही त्यांचीच. त्यामुळे स्वतःला भरपूर वाव मिळावा अशा पद्धतीने त्यांनी नारदाला वाव दिला आहे. काम ते मन लावून करतात. दिग्दर्शक म्हणून त्यांचा फारसा प्रभाव पडत नाही. दिग्दर्शन अन्य कोणाकडे सोपवले असते तर केवळ प्रयोग-यशाकडे अलिप्तपणे पाहून नाटक उभे करण्याकडे अधिक लक्ष दिले गेले असते. मांडणीतील विस्कळीतपणा पुष्कळसा सावरला गेला असता. शिवाय लेखन, दिग्दर्शन, भूमिका असा तिहेरी ताण पडतो तोही हलका झाला असता. कृष्णाची भूमिका उदय गोडबोले करतात. या संगीत नटाला एकही गाणे नाही. म्हणजे गाणारा नट असून शुद्ध गद्य भूमिका मिळणे हा एकप्रकारे त्यांचा गौरवच. कृष्णाची भूमिका त्यांनी चांगली समजावून घेऊन केली आहे. काही प्रसंगी ते जो आरडाओरडा करतात तो त्यांनी जरा कमी करावा.

नाटक संगीत आहे असे या नाटकाच्या जाहिराती पाहून प्रेक्षकांना वाटणे स्वाभाविक आहे. पण प्रत्यक्ष नाटकात एकही पद नाही. त्यामुळे संगीतप्रेमी प्रेक्षकांची निराशा होणे स्वाभाविक आहे. तथापि ज्या पद्धतीने कोल्हटकरांनी विषय उचलला आहे, त्या पद्धतीमध्ये संगीताला वाव नाही. त्यामुळे आहे या परिस्थितीत हे नाटक संगीताशिवायच चांगले वाटते.

प्रयोगाची तारीख आधीच जाहीर केलेली असता काही अडचणी आल्या तरी प्रयोग करावाच लागतो. अशा परिस्थितीत काही उणीवा राहून जातात. मात्र अशा परिस्थितीतही प्रॉम्टिंग ऐकायला मिळेल अशी अपेक्षा नव्हती. परंतु दुसऱ्या अंकात हा चमत्कार पहायला मिळाला. कलाकारही काहीसे बिचकून काम करत होते. प्रयोगसंख्येबरोबर या उणीवा दूर होतीलच; पण त्याखेरीज थोडी काटछाट करून प्रयोग अधिक नीटस करता आला तर अवश्य पहावे.

प्रेक्षकांच्या पसंतीची पावती मिळेल की नाही यासंबंधी अंदाज वर्तवणे अवघड असले, तरी अल्पकाळात शे-सव्वाशे प्रयोग सहज व्हावेत अशी अपेक्षा आहे.

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२४ ते ३० ऑक्टोबर १९७०

# अंदाज

**मेष** : शनिवारपासूनच एक दोन दिवस जरा ठीक नाहीत. जागेसंबंधी भानगडी उपस्थित होतील. त्यात पैसा खर्चावा लागेल. भागीदार चांगले वागणार नाहीत. राग अनावर होईल. तो आवरावा. फौजदारी कामात विनाकारण भाग घ्यावा लागेल.

विद्येत तितकेसे यश मिळणार नाही. त्यातल्या त्यात सरकारी टेक्निकल कोर्सेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना यशःप्राप्ती होईल. मिलिटरीतील नोकऱ्या कायम होतील. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी वकील, प्रकाशक, कॉंट्रॅक्टर्सचा व्यवसाय करणारांची भरभराट होण्याचा शुभ योग आहे.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे ते चांगलेच आहे. मंगळवार-बुधवार सर्व बाबतीत यश प्राप्त होईल. शुक्रवारी अमावास्या असली तरी अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

**वृषभ** : स्थावर संपत्तीबाबतचे सरकारी कामकाज करून घेण्याला दिवस चांगले. मुलामार्फत खटपट यशस्वी होईल. प्रवासात त्रासाचा संभव आहे. सार्वजनिक कामात यशःप्राप्ती होईल. पैशाची अडचण भासेल. २७ ते ३२ वर्षाच्या स्त्रियांना आपोआप विवाहाची मागणी येण्याचा मंगळवार-बुधवारी संभव आहे. विद्याभ्यासात यश येईल. काही विद्यार्थ्यांना विशेषकरून रीसर्च करणारांना सरकारी मानधन मिळण्याचा बराच योग आहे. हा योग आठवड्याच्या शेवटी येईल. धंदा व्यवसाय चांगला चालेल. ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना हा काळ अधिक यशदायी आहे.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शनिवार-रविवार थोडा मानसिक त्रास होईल. मंगळवार-बुधवारी अचानक धनप्राप्ती होईल. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

**मिथुन** : वडिलोपार्जित संपत्तीबद्दल भाऊबंदकी सुरू होईल. पैशाची अडचण सप्ताहाच्या सुरुवातीला जाणवेल. प्रवासयोग येईल, तो टाळावा. मंगळवार-बुधवारी अचानक घरी पाहुणे येतील व शुभकार्याची यशस्वी बोलणी होतील. धनलाभ होईल.

शिक्षणात मनाजोग्या घटना घडतील. सरकारी अनुदान मिळविण्याचा प्रयत्न करण्याला दिवस चांगले आहेत. संततीचा उत्कर्ष होईल. मेडिकल व्यवसायातील

मुलाला अचानक बढती मिळेल. शत्रु-मित्र सर्वच तुमच्या सुखाकरता झटतील. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

कर्क : आठवड्याच्या सुरुवातीपासूनच प्रकृती नरम राहील. थंडी, पडसे व मलेरियाचा ताप येईल. धनस्थानाची स्थिती बिघडेल. अनपेक्षित खर्च करावे लागतील. भावंडांशी मतभेद वाढेल. बोलण्यावर ताबा ठेवावा. मंगळवार-बुधवार प्रवासाचा योग आहे. प्रवासात फायदा होईल.

अभ्यासात प्रगती होईल. मेडिकल सायन्सच्या विषयात संशोधन करणाऱ्यांना भरपूर यश मिळेल. जमिनीची खरेदी-विक्री करणाऱ्यांना व घराची कॉंटॅक्टस् घेणाऱ्यांना त्यांच्या धंद्यात भरपूर धनप्राप्तीचा शुभ योग आहे. मात्र स्त्री मित्रांकडून फसवणूक होण्याची शक्यता आहे.

चंद्राचे भ्रमण २।३।४ स्थानातून आहे, ते मिश्रफल देणारे आहे. शनिवार-रविवार शरीरस्वास्थ्य व मनस्वास्थ्य बिघडेल. गुरुवार-शुक्रवारी वेळ सुखासमाधानात जाईल. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

सिंह : शनिवार-रविवार मानसिक त्रास वाढवणाऱ्या घटना घडतील. राग अनावर होईल. प्रवासयोग सार्वजनिक कामाकरता आहे. त्यात खाजगी कामही सहजगत्या जमून जाईल. मित्र व भागिदार सर्व बाजूंनी मदत करतील. मानमान्यता वाढेल. मंगळवार-बुधवारी पैसा मिळण्याचा योग जोरदार आहे.

भाषा, साहित्य या विषयाचा अभ्यास करणारांना प्रगतिपथावर नेणारा आठवडा आहे. चित्रकला, रसायने तयार करणे, प्रसाधनांचे उत्पादन वगैरे व्यावसायिकांना दिवस फारच चांगले आहेत. मंगळवार-बुधवार अचानक धनलाभाचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे, ते चांगले आहे. फक्त पहिले दोन दिवस असलेला राहू-चंद्र समसप्तक योग त्रासदायक आहे. बाकी संबंध आठवडा प्रगतिपथावर नेणारा आहे.

कन्या : शनिवार-रविवारी मित्रांकडून विश्वासघात होण्याचा बराच संभव आहे. त्यात संततीबद्दल एकादे घोटाळ्याचे प्रकरण उत्पन्न होणार आहे. धनस्थिती चांगली राहील. सरकारातून येणारा पैसा हातात पडेल. बुध-शुक्र-मंगळाचे अन्योन्य योग यशाची गाडी पुष्कळच पुढे ओढून आणतील. सर्व कामात यश मिळेल.

विद्यार्थ्यांना यशःप्राप्ती होणे जड जाईल. एकच शुभ योग म्हणजे कारक अधिपती समोरासमोर आहेत. संतती नीट वागणार नाही. शत्रुनाश होईल. अचानक धनलाभ होईल. व्यापारधंदा चांगला चालेल. शिक्षक, लेखक, प्रकाशक यांना दिवस चांगलेच आहेत.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे, ते शुभफलदायी आहे. पहिले दोन दिवस थोडे त्रासाचे आहेत. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

## अग्निपुत्र

वसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन

**तूळ :** सप्ताहाच्या सुरुवातीलाच खर्चाच्या अनेक बाबींमुळे हैराण व्हाल. पत्नी आजारी पडेल. धाकटी भावंडे सर्व प्रकारची मदत करतील. सरकारी कामाकरता प्रवासयोग येईल. व्यापारउद्योगाला थोडीशी मंदी येण्याचा संभव आहे. मित्रांच्या कामात आपली प्रतिष्ठा पणाला लागेल. पण गुरु-बुध-रवींच्या शुभयोगाने त्यातून यशस्वीरीत्या बाहेर पडता येईल.

विद्येत अडथळा संभवतो. ४२ च्या पुढील व्यक्तींना संशोधनकार्य हातात घेण्याला दिवस चांगले आहेत. ही राशी इंडिकेटची आहे. शत्रूकडूनसुद्धा सर्व कार्यात संपूर्ण मदत होईल. मंगळवार-बुधवारी घरात शुभ समारंभ घडून येईल. शुक्रवारी अनपेक्षित मानसन्मान होईल. लग्नातील पंचग्रही सर्व प्रकारचे यश पदरात टाकील.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

**वृश्चिक :** शनिवारी एखाद्या नाट्यमय प्रसंगात भाग घेण्याचा योग येईल. प्रसंगी महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल. सरकारी कामात सर्व बाजूंनी प्रतिपक्षांकडून हल्ला होईल. राजकीय पुढाऱ्यांना अनेक त्रासदायक प्रसंगांना तोंड द्यावे लागेल. ही राशी इंडिकेटची आहे. रविवारी मानसिक शांतता फारच बिघडेल. हातात घेतलेल्या कामात यशस्वी होणे कठीण पडेल.

संततीकडून नीट वागणूक होणार नाही. भलत्याच महत्त्वाकांक्षेच्या मागे लागून पैशाचा चुराडा उडण्याचा संभव. नाट्यव्यवसायातील स्त्रियांना अनेक बाजूंनी यशस्वी होण्याचा योग आहे. काहींची प्रेमप्रकरणे यशस्वी होतील. भागीदारांकडून व मित्रांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. मंगळवार-बुधवारी घरातील वडिलधाऱ्या मंडळींकडून कौतुक केले जाईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शनिवार-रविवारी जरा कामाची दगदग पडेल. मानसिक यातना होतील. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

**धन :** शनिवारी अचानक धनलाभाचा योग आहे. धार्मिक बाबतीत मन गुंतून जाईल. जगाबद्दल उदासीन विचार मनात येतील. मंगळवार-बुधवार इष्टमित्रांसह आनंदात जातील. घरातील वातावरण चांगले राहील. धनस्थितीत अनपेक्षित सुधारणा होईल. गुरुवार-शुक्रवारी विवाहाला अनपेक्षित मागणी येईल. लाभातील पंचग्रही अत्यंत शुभफलदायी आहे.

अभ्यासात यशःप्राप्ती होईल. शनी पंचमातून जात आहे. पण अकराव्या घरातील गुरु-रवी त्याला वाईट फल देण्यापासून परावृत्त करतील. मंगळवार-बुधवार कलाकारांना जगापुढे येण्याला चांगले आहेत. या आठवड्यात प्रसिद्धी होण्याचा योग आहे. अष्टपैलू गुणांचे जगाकडून कौतुक होईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे ते शुभ आहे. सर्व आठवडाच नोंद करण्यासारखा आहे.

**मकर** : बोलण्यात लक्षात येण्याजोगा उद्धटपणा वाढेल. हा अनुभव शनिवारी-रविवारी फार येईल. जपून वागावे. आर्थिक नुकसान संभवते. प्रवासाला जाण्याचा योग येईल. प्रवास सुखवर्धक होईल. गुरुवार-शुक्रवारी प्रवासात चांगल्या ओळखी होऊन त्यातून विवाह घडवून आणणाऱ्या गोष्टी घडण्याचा दाट संभव आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यश मिळेल. साहित्यिक, चित्रकलाकार, प्रकाशक यांना आपापली कामे हातात घेण्याला दिवस चांगले आहेत. प्रकाशकांची पैशाची अडचण दूर होण्याचा शुभ योग आहे. दशमातील पंचग्रही व्यवसायात प्रमोशन मिळवून देईल. सरकारी कामात मान-मान्यता वाढेल. घरात सर्व बाजूंनी आनंदी वातावरण राहील. मित्रांकडून भाग्योदय होणाऱ्या गोष्टी घडून येतील.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या घरातून आहे ते चांगले आहे. पहिले दोन दिवस मनस्वास्थ्य बिघडेल. बाकी सबंध आठवडा विशेष आहे. शुभ तारखा २७।२८।२९।३०.

**कुंभ** : शनिवार-रविवार मानसिक त्रास होईल. राग अनावर होईल. तो आवरावा. व्यवहारात विसराळूपणाने चुका होतील. धनस्थिती चांगली राहील. भावंडांशी मतभेद वाढू लागतील. प्रवासयोग येईल. घराबद्दलची कामे मनासारखी होतील. भागीदार व पत्नी सर्व बाबतीत मदत करतील.

सामाजिक दर्जाला थोडासा कमीपणा येण्याचा संभव आहे. आत्मघातकी विचार वाढतील. संततीचा उत्कर्ष होईल. व्यवसाय चांगला मिळेल. मंगळवार-बुधवार उद्योग-धंद्याकरता केलेली खटपट यशस्वी होईल. सर्व इष्टमित्र, नातलगमंडळी एकत्र येऊन दिवाळीचा आनंद वाढवतील. भाग्योदयकारक घटना घडतील.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे ते मात्र चांगले आहे. पहिले दोन दिवस सोडले तर बाकी सर्व सप्ताह शुभ आहे.

**मीन** : शनिवार-रविवार संतती मनाविरुद्ध वागणार आहे. मनस्ताप करून फायदा नाही. वाचा शुद्धी कमी झाली असल्यामुळे बोलणे आवरावे. भावंडांकडून सर्व बाबतीत मदत होण्याचा योग आहे. अत्यंत अवघड वाटणाऱ्या सरकारी कामात सहजरीत्या यशःप्राप्ती होईल. शत्रूकडूनसुद्धा न कळत मदत केली जाईल. धार्मिक बाबतीत खर्च होईल.

शैक्षणिक क्षेत्रात थोडेसे अपयश येईल. मनासारख्या गोष्टी घडणार नाहीत. बुद्धिजीवी वर्गाला खूपच कष्ट करावे लागतील. शुक्र-मंगळाखेरीज सर्वच ग्रह आठव्या स्थानात आहेत. त्यांना योगबळ चांगले आहे, पण स्थानबळ नाही. एकंदर सर्व बाबतीत धांदल उडेल. अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. पहिले दोन दिवस स्वास्थ्य बिघडेल. बाकी सर्व सप्ताह शुभ आहे. ◻ ◻ ◻

---

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**




"ह्यांचा लोकलचा फर्स्ट क्लासचा पास होता, डॉक्टर न् यानी पैज मारली की लागोपाठ आठ दिवस लांबून गाडी पाहून अशा जागी प्लॅटफॉर्मवर उभं राह्यचं की फर्स्ट क्लास नेमका समोर आला पाहिजे. गाडी प्लॅटफॉर्मवर थांबल्यावर...."